रविवार
०९
ऑगस्ट २०२६

पुणे
पाने : ८
अंक : १३
वर्ष : ६
किंमत : रू.३/-

मुख्य संपादक : डि.एस.लोखंडे पाटील
epaper.chaluwartha.com
www.chaluwartha.com
RNI No.: MAHMAR/2021/82895

# दैनिक चालु वार्ता

तापमान
दिवस : 29° उच्च
रात्र : 21° किमान
सूर्योदय : १२ तास ५१ मिनिटे
उगवणे :06:14 AM
मावळणे :07:05 PM
सूर्यास्त : १३ तास ५७ मिनिटे
उगवणे : 02:14 PM
मावळणे : 04:11 AM

LIVE $
24k सोने प्रति १० ग्रॅम
रू.१,५२,३५०/-
22k सोने प्रति १० ग्रॅम
रू. १,३९,६५०/-
चांदी प्रति किलो
रू. २,४५,०००/-
डॉलर प्रति दर
रू.९५.१६

पुणे ✲ नांदेड ✲ छ.संभाजीनगर ✲ बीड ✲ परभणी ✲ हिंगोली ✲ जालना ✲ लातूर ✲ धाराशिव ✲ मुंबई ✲ पालघर ✲ ठाणे ✲ रायगड ✲ रत्नागिरी ✲ अहमदनगर ✲ सोलापूर ✲ सातारा ✲ सांगली ✲ अमरावती ✲ कोल्हापूर ✲ गडचिरोली ✲ यवतमाळ ✲ नाशिक ✲ वर्धा ✲ वाशिम ✲ चंद्रपूर

# सोलापुरातून जरांगे पाटील कडाडले!

## २९ ऑगस्टला घरासमोर एकही गाडी ठेवू नका, राज्यातील सर्व मराठ्यांनी...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**सोलापूर :** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील हे सध्या पश्चिम महाष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी बोलताना त्यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. समज गैरसमज नको,आम्ही इशारा सभा कोठेही लावलेल्या नाहीयेत, सोलापूर जिल्ह्यात लावली असती तर रस्ते सगळीकडून भरलेले दिसले असते. आम्ही फक्त गावखेड्यातल्या लोकांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेतोय, आणि जे सत्य आहे ते समाजाला सांगण्याचा प्रयत्न करतोय. यामध्ये नुकसान सर्वांचं आहे, यामध्ये फक्त गरीब मराठ्यांचे नुकसान नाहीये, तर यामध्ये भाजप, शिवसेना, काँग्रेसमध्ये असलेल्या मराठा बांधवांचं देखील नुकसान आहे. व्हॅलीडिटी रद्द करण्यात येत आहेत, आणि मी हे समाजाला दाखवून दिलं आहे, असं यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.



दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, मी समाजाच्या हित बघितलं, रक्त जाळून जाळून ५८ लाख नोंदी दिल्या. यांना माहीत आहे की जरांगे पाटील पक्ष आरक्षण देतोय, मात्र त्यांना आरक्षण द्यायचं नाही. सरकारने आता एक कट रचला आणि गैर समज पसरवला आहे. नियोजित कट रचला, ४ प्रमाणपत्र रद्द केले, असंही यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

दरम्यान २९ ऑगस्टपासून पुन्हा एकदा मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील हे आंदोलन करणार आहेत. या पार्श्वभूमीवर देखील त्यांनी यावेळी मराठा समाजाला आवाहान केलं आहे. मराठ्यांनो घर सोडायला शिका. २९ ऑगस्ट ला घरासमोर एकही गाडी राहू नये, राज्यातील सर्व मराठ्यांनी आंतरवालीत या, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये असलेल्या मराठ्यांनी माझी चूक सांगावी, संजय शिरसाठ यांनी फोन करून कुणबी प्रमाणपत्र रद्द करायला सांगितलं, यात मी चुकीचं काय बोललो? घोडके नावाच्या व्यक्तीची व्हॅलिडीटी झाली आणि बहिणीची रद्द झाली यात मी चुकीचं काय बोललो? सगळ्या पक्षातल्या मराठ्यांच्या लेकीबाळींच वाटोळ करायला लागलेत म्हणून मी बोलतोय, मी याबाबतचे पत्र सुद्धा आणले आहे, असंही यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

## देश विदेश थोडक्यात

### रशियासोबतची मैत्री भारताला पडणार महाग?

#### अमेरिकेच्या सिनेटमध्ये १००% टॅरिफ विधेयक मंजूर, भारतासह ५ देशांवर संकट...




दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** अमेरिकेच्या सिनेटने रशियाकडून पेट्रोलियम उत्पादने खरेदी करणाऱ्या देशांवर मोठे शुल्क लावण्यासंदर्भातील विधेयक मंजूर केले आहे. या प्रस्तावानुसार, रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या जगातील पाच प्रमुख देशांवर अमेरिकेकडून १०० टक्क्यांपर्यंत शुल्क आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. या यादीत भारतासह चीन आणि अन्य तीन देशांचा समावेश आहे. सिनेटमधील मंजुरीनंतर आता हे विधेयक प्रतिनिधीगृहात मांडले जाणार आहे.

**रशियन तेल खरेदीला विरोध का?**

रशियाकडून तेल खरेदी केल्यामुळे युक्रेनविरोधातील युद्धासाठी रशियाला आर्थिक मदत मिळत असल्याचा दावा अमेरिकेकडून करण्यात आला आहे. त्यामुळे रशियावर आर्थिक दबाव वाढवण्यासाठी तसेच त्याच्या युद्धासाठी उपलब्ध होणारा निधी रोखण्यासाठी हे विधेयक आणण्यात आले आहे.

'लिंडसे ओ. ग्रॅहम सँक्शनिंग रशिया अँड इराण ॲक्ट ऑफ २०२६' या नावाने मांडण्यात आलेले विधेयक अमेरिकेच्या सिनेटमध्ये ८६ विरुद्ध ११ मतांनी मंजूर झाले. विधेयकाला मंजुरी मिळाल्यामुळे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना रशियन तेल खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्के शुल्क लावण्याचा अधिकार मिळणार आहे. मात्र, त्यासाठी प्रतिनिधीगृहातील मंजुरीची प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे.

**भारतासह पाच देश निशाण्यावर**

रशियाकडून तेल आयात करणाऱ्या जगातील पाच प्रमुख देशांमध्ये भारताचा समावेश आहे. भारतासोबत अझरबैजान, चीन, हंगेरी आणि स्लोव्हाकिया हे देशही या यादीत आहेत. प्रतिनिधीगृहानेही विधेयक मंजूर केल्यास या पाचही देशांवर १०० टक्के शुल्क लागू करण्याचा अधिकार अमेरिकेच्या अध्यक्षांकडे असेल.

**रशियासोबतच इराणवरही निर्बंध**

या विधेयकाचा आणखी एक महत्त्वाचा भाग रशियाशी संबंधित निर्बंधांबरोबरच इराणशी संबंधित आहे. रशियाच्या पहिल्या पाच तेल आयातदार देशांवर आर्थिक निर्बंध लागू करण्यासोबतच रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन, रशियन उद्योगपती आणि वित्तीय संस्थांवरही निर्बंध लादण्याची तरतूद यात आहे. याशिवाय, १९९६ च्या इराण निर्बंध कायद्याची मर्यादा २०३१ पर्यंत वाढवण्याची तरतूद विधेयकात आहे. त्यामुळे इराणच्या ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांवर २०३१ पर्यंत या कायद्याचा परिणाम कायम राहणार आहे.

**विधेयकाला लिंडसे ग्रॅहम यांचे नाव**

हे विधेयक रिपब्लिकन सिनेटर लिंडसे ग्रॅहम यांनी सुरू केले होते. अमेरिकेतील दोन्ही प्रमुख राजकीय पक्षांचा त्याला पाठिंबा आहे. युक्रेनच्या दौऱ्यावर असताना ११ जुलै रोजी लिंडसे ग्रॅहम यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर सिनेटमधील दोन्ही पक्षांनी त्यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी विधेयकाला त्यांचे नाव दिले.

ग्रॅहम यांच्या निधनानंतर त्यांची बहीण डार्लीन ग्रॅहम यांची त्यांच्या जागेवर नियुक्ती करण्यात आली. विधेयक मंजूर झाल्यानंतर डार्लीन यांनी म्हटले की, या कायद्यामुळे रशियन अर्थव्यवस्थेला पाठिंबा देणाऱ्या देशांना अमेरिकेसोबत व्यापार करायचा की रशियाकडून स्वस्त तेल खरेदी करायचे, यापैकी एक महत्त्वाचा निर्णय घ्यावा लागेल.

## तुकाराम मुंढेंची राज्यभर धडाकेबाज कारवाई

### मुख्यमंत्री फडणवीसांनी थेट दिल्या तीन सूचना...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** राज्यभरात भेसळयुक्त अन्नपदार्थ आणि बेकायदेशीर गुटखा विक्रीविरोधात कठोर पावले उचलणारे अन्न आणि औषध प्रशासन (FDA) विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कारवाईचा धसका सध्या गैरप्रकार करणाऱ्यांनी घेतला आहे. दूध भेसळ, सणासुदीच्या काळात मिठाईतील गैरप्रकार आणि गुटखा विक्रीवर छापे टाकून कोट्यवधी रुपयांचा साठा जप्त केल्यानंतर राज्यभर त्यांचे कौतुक होत आहे. मात्र तुकाराम मुंढे अन्न आणि औषध प्रशासन विभागात ऋजू झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी काय सूचना दिल्या होत्या यावर त्यांनी पहिल्यांदाच भाष्य केले आहे. न्यूज १८ मराठीशी बोलताना त्यांनी या विषयी सांगितले आहे.



महाराष्ट्रात सुरूअसणाऱ्या सुरु असणाऱ्या संपूर्ण कारवाईबाबत बोलताना तुकाराम मुंढे म्हणाले की, नवीन चॅनेल किंवा विभागात पोस्टिंग झाल्यानंतर जनरली अशा प्रकारची चर्चा होत असते. राज्य सरकारचा भर हा 'सेफ फूड, सेफ ड्रग्ज आणि सेफ महाराष्ट्र' या संकल्पनेवर आहे. मुख्यमंत्र्यांनी या सेक्टरमध्ये राज्याला अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करण्याच्या सूचना दिल्या. कारण या क्षेत्रातील कामाचा थेट परिणाम हा महाराष्ट्रातील शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या आरोग्यावर होत असतो. त्यामुळे या कारवाईत आणि कामात कोणतीही तडजोड केली जाणार नाही.

**फडणवीसांनी काय सूचना दिल्या?**

राज्याला सुरक्षित अन्न आणि सुरक्षित औषधे पुरवून 'सेफ महाराष्ट्र' हे ध्येय साध्य करायचे आहे. यासाठी प्रशासनाकडून आवश्यक असणारा सर्व पाठिंबा (सपोर्ट) आणि कारवाईबाबतच्या सर्व स्पष्ट सूचना देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याचे तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले. येत्या काळात अन्न व औषध प्रशासनासह संबंधित क्षेत्रात नियमभंग करणाऱ्यांवर कडक कारवाईचा बडगा उचलला जाणार असून, सरकारकडून त्यांना पाठबळ देण्यात आले आहे.

महाराष्ट्रामध्ये आपल्याला या सेक्टरमध्ये अत्यंत चांगलं काम करायचं आहे. त्याचा परिणाम शेतकऱ्यावर होतो, सर्वसामान्यांच्या आरोग्यावर होतो. त्यामुळे कोणताही कॉम्प्रमाईज न करता जे आपल्याला सेफ फूड, सेफ ड्रग्ज, सेफ महाराष्ट्र जो अचिव्ह करायचा आहे. आवश्यक असलेल्या पूर्ण सपोर्ट आणि त्यासाठी असलेल्या सर्व सूचना दिल्या आहेत.

**तीन दिवस, ३१ धाडी, २ कोटीचा साठा जप्त**

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) ४ ते ६ ऑगस्ट या तीन दिवसांत राज्यभर विशेष धडक मोहीम राबवत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत प्रतिबंधित गुटखा, पान मसाला तसेच इतर अन्नपदार्थांवर छापे टाकत एकूण ३१ धाडी टाकण्यात आल्या. या कारवाईत २ कोटी ८२ लाख ९९ हजार ७७२ किमतीचा साठा जप्त करण्यात आला असून २२ जणांना अटक करण्यात आली आहे.

प्रतिबंधित गुटखा आणि पान मसाल्याविरोधातील कारवाईत १९ एफआयआर दाखल करण्यात आले असून २०.२९ लाखांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला आहे. तर दूध, दुग्धजन्य पदार्थ, बेकरी, मसाले, खाद्यतेल आदी अन्नपदार्थांवर कारवाई करत २.६२ कोटींचा साठा जप्त करण्यात आला. याच मोहिमेत राज्यभरातील ६३ हॉटेल, रेस्टॉरंट आणि धाब्यांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ३८ आस्थापनांना सुधारणा नोटीस, तर ७ आस्थापनांचे एफएसएसएआय परवाने निलंबित करण्यात आले.

बृहन्मुंबईत दादर, अंधेरी, सांताक्रूझ आणि कुर्ला येथील चार खाद्य आस्थापनांचे परवाने स्वच्छतेच्या गंभीर त्रुटींमुळे निलंबित करण्यात आले. आयआयटी बॉम्बेच्या काही हॉस्टेल मेसनाही आवश्यक परवाना नसल्याने व्यवसाय बंद करण्याचे आदेश देण्यात आले. एफडीएने स्पष्ट केले आहे की, 'Safe Food, Safe Maharashtra' मोहिमेअंतर्गत अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनां विरोधात पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार आहे.

## अभिजीतच्या नियतीमध्ये खोट

### राजा सारखा वागतोय...




CJP च्या सदस्याच्या आरोपाने मोठी खळबळ!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर देशभरात कॉकरोच जनता पार्टी चर्चेचा विषय ठरली आहे. या पार्टीचा संस्थापक अभिजीत दीपकेंचे आता पुढचे पाऊल काय असणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, आता सीजेपीच्या दोन सदस्यांनी अभिजीत यांच्यावर आरोप करत उपोषण केले आहे. त्यांनी अभिजीत यांच्या नियतीमध्ये खोट असल्याचे म्हटले आहे.

छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्त कार्यालयासमोर सीजेपीच्या मनीष ब्रह्मभट आणि राहुल पांड्यांचं अन्नपाणी त्याग उपोषण सुरूआहे. दरम्यान, त्यांनी माध्यमांशी बोलताना दीपकेंवर गंभीर आरोप केले आहेत.

माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, अभिजीतच्या नियतीमध्ये खोट आहे. राजासारखा वागतोय. राजा निर्णय स्वतः घेतो तसा तो वागतोय... निर्णय तरुणांना आणि देशातील आंदोलनात उतरलेल्या व्हॉलेंटियर्सला घेऊन व्हायला हवे. नियत चुकीची असली तरी आम्ही नुकसान होऊ देणार नाही. लोकांनी आवाज उठवलाय, सरकार विरोधात बोलतायत आणि तो आवाज दाबला जाऊ नये म्हणून आम्ही बोलतोय

पुढे त्यांनी अभिजीतवर गंभीर आरोप केले आहे. ते म्हणाले, मी जे ग्रुप बनवले होते त्याच व्हाट्सअप गुप मधून मला बाहेर काढले. बाकी लोकांसोबत आमचा संपर्क होऊ नये म्हणून हे सर्व केले जात आहे. जे व्हॉलेंटियर्स आमच्यासोबत बोलत आहेत त्यांचादेखील ब्रेन वाश करण्याचं काम हे करत आहेत.

शेवटी त्यांनी म्हटले की, तो आम्हाला काही बोलू शकतो मात्र आमचं सत्य लपवू शकत नाही. आम्ही इथे मेलो तरी चालतो पण इथून उठणार नाही आणि


(पान ४ वर...☞)

## स्वतंत्र 'ब्रिक्स' चलनाची कल्पना भारताला अमान्य – गोयल

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** रशिया, ब्राझील, चीनचा समावेश असलेल्या 'ब्रिक्स' देशांच्या स्वतंत्र चलनाच्या बाजूने भारत नाही आणि अशा कोणत्याही योजनेचे समर्थन करत नाही, अशी स्पष्ट भूमिका केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी शुक्रवारी येथे मांडली. गेल्या काही वर्षांपासून चीन आणि रशिया यांसारखे सदस्य देश अमेरिकी डॉलरला पर्याय म्हणून किंवा स्वतंत्र 'ब्रिक्स चलन' निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. अशा पार्श्वभूमीवर गोयल यांनी भारताची म्हणून स्पष्ट केलेली भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे. वर्ष २०२४ मध्ये, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ब्रिक्स देशांना अमेरिकी डॉलरची जागा घेण्याच्या कोणत्याही हालचालीविरोधात इशारा दिला आहे.

आशियाई, आफ्रिकी आणि लॅटिन अमेरिकेतील उदयोन्मुख अर्थव्यवस्थांची संघटना असलेल्या 'ब्रिक्स'मध्ये भारतासह, ब्राझील,



रशिया, चीन, दक्षिण आफ्रिका, इजिप्त, इथिओपिया, इंडोनेशिया, इराण, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती या ११ देशांचा समावेश आहे. जागतिक व प्रादेशिक महत्त्वाच्या मुद्द्यांवर तसेच आंतरराष्ट्रीय राजकीय आणि आर्थिक धोरणांवर चर्चा आणि सहकार्य करण्यासाठी हे एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे.ब्रिक्सच्या सदस्य देशांमध्ये संतुलित व्यापार आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्याच्या मार्गांवर उपस्थित मंत्र्यांनी चर्चा केली. शिवाय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) सोप्या पद्धतीने आणि पुरेसा वित्तपुरवठा उपलब्ध करून देण्याबाबतही मंत्र्यांनी विशेष विचारविनिमय केला, असे गोयल यांनी सांगितले.

## पुणे पोलिसांच्या 'धिंड पॅटर्न' ला ब्रेक!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** गुन्हेगारांना वठणीवर आणण्यासाठी पुणे पोलिसांकडून राबविला जाणारा 'धिंड पॅटर्न' वादाच्या भोवऱ्यात सापडल्यानंतर पुणे पोलिसांनी नरमाईचे धोरण स्विकारले आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी अटक आरोपींच्या वागणुकीसंदर्भात कठोर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

आरोपींचा सार्वजनिक अपमान होईल, अशा कोणत्याही प्रकारची वागणूक देऊ नये, तसेच त्यांचे फोटो किंवा व्हिडिओ सोशल मिडीयावर प्रसिद्ध होणार नाहीत, याची विशेष काळजी घेण्याचे आदेश दिले आहेत.

राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांबरोबरच भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ आणि महाराष्ट्र पोलिस मुख्यालयाच्या आदेशांचा संदर्भ देत हे परिपत्रक काढण्यात आले आहे. भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यातील एका प्रकरणातील अल्पवयीन आरोपींची कथित धिंड काढणे आणि अपमानास्पद वागणूक दिल्याच्या घटना



### अटक आरोपींचे फोटो-व्हिडिओ प्रसिद्ध करण्यासही बंदी...

तसेच लक्ष्मीनगर पोलिसांनी आरोपींची भररस्त्यात गुडघ्यावर बसवून काढलेल्या धिंडीनंतर राज्य मानवी हक्क आयोगाने गंभीर दखल घेतली. नुकतेच आयोगाच्या समितीने भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात येऊन संबंधित अधिकारी यांचे जबाब नोंदवले. नोंदी तसेच सीसीटीव्ही आणि व्हायरल व्हिडीओची चौकशी केली. संबंधित प्रकरणाचा अंतिम अहवाल आयोगाला सादर केला जाणार आहे.

दरम्यान, या पार्श्वभूमीवर पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी सर्व पोलिस ठाणे, शाखा आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत. परिपत्रकानुसार, कोणत्याही आरोपीची धिंड काढणे, सार्वजनिक अपमान होईल अशा पद्धतीने फिरविणे किंवा हातपाय बांधून मिरविणे यावर स्पष्ट बंदी घालण्यात आली आहे. अटक ते न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कायद्यानुसार आणि मानवी हक्कांचा सन्मान राखूनच कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय, अशा प्रकारच्या घटना

(पान ४ वर...☞)

## आम्ही थंड होणार नाहीत...

### उद्धव ठाकरे यांचा सरकारला मोठा इशारा, देशात...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** उद्धव ठाकरे यांनी सरकारवर मोठा आरोप केला, सरकार बदलण्याची वेळ आता आल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले. उद्धव ठाकरे यांनी म्हटले की, गेल्या चार वर्षापासून केसची सुनावणी सुरूझाली आहे.

मी आजपर्यंत कधीही आणि या पुढेही हे प्रकरण न्यायालयात असल्याने बोललो नाही. बोलणार नाही. संविधानाप्रमाणे निकाल द्यावा. लागेल याची खात्री आहे. न्यायालयाबद्दल विश्वास आणि खात्री आहे. पण देशात जे वातावरण आहे, त्याबद्दल बोलायचं आहे.पावसाळा सुरू आहे. शाळेत मतलई वाऱ्याचा प्रकार ऐकला होता. या वाऱ्यामुळे जमीन थंड होते. आता देशात मतलबी वारे सुरू आहे. विरोधातून सत्ताधाऱ्यांकडे लोक जातात. त्यांना वाटतं विरोधक थंड होतील. पण तसं होणार नाही. देशात कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. ही वादळापूर्वीची शांतता आहे.



आम्ही थंड होणार नाहीत, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी सरकारला मोठा इशारा दिला. उद्धव ठाकरेंनी म्हटले, गेले महिने दोन महिने संपूर्ण जगात देशातील तरुणाईंची जेंनजीने सरकारला कसं गुडघ्यावर आणलं त्याची चर्चा सुरू आहे. या पिढीला आधार देण्याऐवजी त्यांच्यावर अत्याचार केले. जालियनवाला बागेच्या हत्याकांडाची आठवण व्हावी असा अत्याचार केला.

वाईट पद्धतीने ट्रोल केलं, देशद्रोही संबोधलं. एवढं करून त्यांच्याबरोबर बोलण्याची पंतप्रधानाची तयारी नाही. गृहमंत्र्यांची हिंमत नाही. देश पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांना सवाल करत आहे. तुम्ही आत्याचार का केला. एका

(पान ४ वर...☞)

# निर्भीड, नि:पक्ष, नि:स्वार्थ पत्रकारितेचा सन्मान

## पत्रकार गंगाधर कदम यांना 'ठाणे शहर उत्कृष्ट पत्रकार-२०२६' पुरस्कार प्रदान

## स्वारगेट, पुणे येथे भव्य पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**ठाणे - प्रतिनिधी**

**ठाणे :** समाजातील विविध प्रश्नांवर सातत्याने निर्भीड, नि:पक्ष आणि जनहिताची पत्रकारिता करत जनतेचा आवाज बुलंद करणारे पत्रकार गंगाधर कदम यांना 'ठाणे शहर उत्कृष्ट पत्रकार-२०२६' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्य, सामाजिक बांधिलकी आणि वस्तुनिष्ठ वृत्तांकनाची दखल घेत हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक विविध समस्या, लोकहिताचे प्रश्न आणि स्थानिक पातळीवरील अनेक वस्तुनिष्ठ व प्रामाणिक मुद्दे जनतेसमोर मांडण्याचे काम गंगाधर कदम सातत्याने करत आहेत. देखील तळागाळातील जनमानसांवर सकारात्मक परिणाम करणाऱ्या त्यांच्या सक्रिय सहभागाची दखल घेण्यात आली. या सन्मान सोहळ्याला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ओ.एस.डी. मंगेश चिवटे, मुख्य संपादक डी एस लोखंडे पाटील, पत्रकार नेते, तसेच दैनिक चालु वार्ताच्या कार्यकारी संपादिका सोनाली कवाडे पाटील व मान्यवरांची उपस्थिती लाभली.



पुरस्कार स्वीकारताना गंगाधर कदम यांनी आपल्या मनोगतात सांगितले, 'हा सन्मान फक्त माझा नसून सत्यासाठी कायम साथ देणाऱ्या माझ्या वाचकांचा, सहकाऱ्यांचा आणि समाजातील प्रत्येक नागरिकांचा आहे.'

यापुढेही सत्य, नि:पक्ष आणि समाजहित या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवून पत्रकारिता करत राहीन,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

पत्रकारितेतील सातत्यपूर्ण योगदानाबद्दल मान्यवरांनी गंगाधर कदम यांचे विशेष कौतुक करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**सन्मानाची वैशिष्ट्ये**

गौरव : ठाणे शहर उत्कृष्ट पत्रकार-२०२६

पुरस्कारार्थी : पत्रकार गंगाधर कदम

क्षेत्र : पत्रकारिता व सामाजिक जनजागृती

ठिकाण : स्वारगेट, पुणे

दैनिक : २ ऑगस्ट २०२६

आयोजक : दैनिक चालू वार्ता

सन्मान : सामाजिक, मानवीय व प्रशासकीय

**प्रमुख उपस्थिती :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ओ.एस.डी. मंगेश चिवटे, मुख्य संपादक डी एस लोखंडे पाटील, कार्यकारी संपादिका सोनाली कवाडे पाटील व मान्यवर;

**गंगाधर कदम यांचे मनोगत**

'समाजातील समस्यांवर प्रकाश टाकणे हेच माझे पत्रकारितेचे ध्येय आहे. हा सन्मान पुरस्काराने नसून समाजाची नेहमी पाठबळ करणाऱ्या माझ्या वाचकांचा आहे.'

**गंगाधर कदम (पत्रकार)**

पुरस्कारानंतर पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर, वाचकवर्ग आणि हितचिंतकांकडून गंगाधर कदम यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

# पूरग्रस्त हसनाळकर प्रलंबित मागण्या सोडवण्यासाठी शेकडो निवेदने देऊनही शासनाकडून निराशा

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**मुखेड - प्रतिनिधी**
**गौतम पोटफोडे**

**मुखेड :** लेंडी मध्यम प्रकल्पग्रस्त हसनाळ व परिसरातील नागरिकांच्या प्रलंबित मागण्या तात्काळ मंजूर करणे, गळभरणी परवानगीची चौकशी करणे व अन्यथा दिनांक १८ रोजी जलसमाधी आंदोलनाबत. महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासंबंधीतील लागू असलेली कायदे, पुनर्वसन धोरणे तसेच भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १४ (समानतेचा अधिकार) व अनुच्छेद २१ (जीवन व सन्मानाने जगण्याचा अधिकार) यांच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांना प्रथम सुरक्षित पुनर्वसन व मुलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची वैधानिक व नैतिक जबाबदारी आहे.

**मागण्या मान्य न झाल्यास जलसमाधीचा इशारा**

लेंडी मध्यम प्रकल्पामुळे हसनाळ व परिसरातील नागरिकांचे मोठे नुकसान झाले. पाच नागरिकांचा मृत्यू, शेकडो कुटुंबे बेघर झाली. तरीही घटनेस एक वर्ष पूर्ण होत असताना अनेक प्रकल्पग्रस्तांना आजही न्याय मिळालेला नाही. शासनाचे आधी पुनर्वसन मग धरण हे मूलभूत धोरण प्रत्यक्षात राबविले गेले नसताना गळभरणीची परवानगी कशी देण्यात आली, याची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी व दोषींवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

हसनाळ गावातील पात्र लाभार्थ्यांना प्रलंबित १,००,००० वाहतूक भत्ता तात्काळ अदा करण्यात यावा. हसनाळ पुनर्वसन गावाचा संरक्षण भिंत बांधण्यात यावी. चार गावांच्या पुनर्वसनासाठी सर्व ऋतुमध्ये वाहतुकीस योग्य असा पक्का रस्ता तात्काळ करण्यात यावा. मृत व्यक्तींच्या वारसांना प्रलंबित सानुग्रह अनुदान तात्काळ देण्यात यावे. खाजगी पुनर्वसन माऊली मंदिर रस्ता मंजूर करून पूर्ण करण्यात यावा.

बरवस्तमाळ येथे तात्काळ बोअरवेल करून पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी. खानापूर पुनर्वसन येथे शासकीय भुखंड (प्लॉटलगत) असलेली स्मशानभूमी अन्यत्र स्थलांतरित करावी किंवा संबंधित कुटुंबाना पर्यायी सोईस्कर भुखंड नेमून देण्यात यावेत.

घरकुल अनुदानाची संपूर्ण रक्कम, शासकीय पुनर्वसन खानापूर वारसातील सदस्यांना ताबा पावती देण्यात यावी, तसेच लेंडी नदीला आलेल्या पुरामुळे शासनाच्या हलगर्जीपणामुळे मयत झालेल्या व्यक्तींना खानापूर पुनर्वसन येथे राखीव जागा शासकीय देऊन स्मारक उभारावे, नियोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर जागेचा हस्तांतर समाजाला द्यावे, सार्वजनिक मंदिरासाठी जागा द्यावी तसेच पायाभूत सिमेंटचे रस्ते, घरोघर नळाची सोय, एकरकमी वितरित करण्यात यावी. घरकुल बांधकामासाठी आवश्यक रेती तात्काळ उपलब्ध करून द्यावी. वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या अविवाहित मुला-मुलींना वाढीव मावेजा मंजूर करावा. सर्व बेघर पात्र कुटुंबांना निवासी प्लॉट देण्यात यावेत. प्रत्येक पात्र धरणग्रस्तास ५,००,००० विशेष आर्थिक मदत देण्यात यावी.

वरील मागण्या तात्काळ मान्य करून अंमलबजावणी करण्यात यावी. अन्यथा, दिनांक १८ ऑगस्ट २०२६ रोजी लेंडी धरणावर जलसमाधी आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनादरम्यान उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस संपूर्णपणे शासन व संबंधित प्रशासन जबाबदार राहील.

# किनवट कृऊबा वाद चिघळला

## विशेष सभा वैध की अवैध?

## '२.५२ कोटी' प्रकरणी आरोप-प्रत्यारोप तीव्र

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**किनवट - प्रतिनिधी**
**शुभम शिंदे**




**किनवट :** किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीतील कथित रू.२.५२ कोटींच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाने आता नवे वळण घेतले असून, ८ ऑगस्ट रोजी पार पडलेल्या विशेष सभेच्या वैधतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एका बाजूला सचिव रवींद्र राठोड यांना निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचा दावा करण्यात येत असताना, दुसऱ्या बाजूला ही सभा नियमबाह्य असल्याचे सभापती गजानन मुंडे यांनी स्पष्ट केल्याने संपूर्ण प्रकरण अधिकच गुंतागुंतीचे बनले आहे.

पणन संचालकांच्या निर्देशानुसार आयोजित करण्यात आलेल्या या विशेष सभेला सभापती मुंडे अनुपस्थित राहिल्यामुळे उपसभापती राहुल गेमसिंग नाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडल्याचे सांगितले जाते. या बैठकीत सचिव राठोड यांना तात्काळ निलंबित करणे, प्रभारी सचिव म्हणून विकल रंगनेनीवार यांची नियुक्ती करणे तसेच संपूर्ण गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन करणे असे तीन ठराव एकमताने मंजूर करण्यात आल्याचे उपस्थित संचालकांनी सांगितले.

दरम्यान, बाजार समितीच्या मुदत ठेवीतून सुमारे रू.२,५२,८६,६७५ इतकी रक्कम बेकायदेशीररीत्या काढून खाजगी वापरासाठी वळविण्यात आल्याचा ठपका सचिवांवर ठेवण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आल्याचे सांगितले जात असले तरी, या निर्णयावर सभापतींनी आक्षेप घेतला आहे.

सभापती गजानन मुंडे यांच्या मते, ७ जुलैलाच उपनियम २९(३) अन्वये उपसभापतींसह १४ संचालकांना बडतर्फ करण्यात आले असून, त्यानंतर या संचालकांना कोणत्याही प्रकारची बैठक घेण्याचा अधिकार उरत नाही. त्यामुळे ८ ऑगस्ट रोजी घेण्यात आलेली विशेष सभा बेकायदेशीर ठरते, असा त्यांचा दावा आहे. तसेच उपसभापती राहुल नाईक यांनी पदाचा राजीनामा दिलेला असताना त्यांनीच सभेचे अध्यक्षस्थान भूषवणेही प्रश्नांकित असल्याचे ते म्हणाले. याउलट, महिला संचालक कुसुम गणपत मुंडे व अनुसया मनोहर पेंदोर यांनी सभापतींवर त्यांच्या नावाने खोटे अर्ज तयार करून दिशाभूल केल्याचा आरोप केला आहे. मात्र हा आरोप सभापतींनी फेटाळून लावत, या संदर्भात दोन महिन्यांपासून अधिकृत पत्रव्यवहार सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. या सर्व घडामोडींमध्ये आणखी एक नवा अध्याय समोर आला असून, सभापती मुंडे यांनी ई-मेलद्वारे पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवत १४ संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. समितीच्या निधीचा गैरवापर, विश्वासघात, संगनमत आणि संस्थेच्या हिताला बाधा पोहोचवणारी कृत्ये केल्याचे गंभीर आरोप त्यांनी आपल्या फिर्यादीत नमूद केले आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून किनवट कृषी उत्पन्न बाजार समिती सातत्याने वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. शेतकऱ्यांची देयके, सचिवांचा कारभार, संचालकांमधील अंतर्गत मतभेद या मुद्द्यांवरून वातावरण तापलेले असतानाच आता हा आर्थिक गैरव्यवहार आणि कायदेशीर पेचप्रसंग समोर आला आहे. 'दोन हत्तींच्या लढाईत गवत चिरडते' या म्हणीप्रमाणे, या संघर्षाचा फटका अखेरीस शेतकरी आणि बाजार व्यवस्थेलाच बसणार का, अशी चिंता व्यक्त केली जात आहे.

आता या प्रकरणात ८ ऑगस्टची सभा वैध ठरणार की बेकायदेशीर, सचिवांवरील आरोप सिद्ध होणार की फेटाळले जाणार, तसेच संचालक आणि सभापती यांच्यातील संघर्ष कोणत्या दिशेने जाणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# इंजनगावातील वादग्रस्त जागेवरील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा बौद्ध विहारात

## प्रशासनाच्या मध्यस्थीने वादावर तोडगा; समाजबांधवांनी विधीपूर्वक केली पूजा

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**वसमत - प्रतिनिधी**
**बालाजी अडकीने**

**वसमत :** वसमत तालुक्यातील इंजनगाव (पश्चिम) येथील वादग्रस्त जागेवर मध्यरात्री उभारण्यात आलेल्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचा प्रश्न अखेर प्रशासनाच्या मध्यस्थीने शांततेच्या मार्गाने निकाली निघाला. समाजबांधवांनी वादग्रस्त जागेवरील पुतळा तेथून सन्मानपूर्वक हलवून बौद्ध विहार येथे उभारला. यावेळी समाजबांधवांनी सामूहिक वंदना घेत विधीपूर्वक पूजा-अर्चा केली. प्रशासनाच्या समन्वयातून संवेदनशील प्रश्न शांततेने मार्गी लागल्याने गावातील तणाव निवळला आहे. शनिवारी मध्यरात्री इंजनगावातील वादग्रस्त जागेवर लोखंडी अँगल जमिनीत सिमेंटने बसवून त्यावर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्यात आला. ही जागा पूर्वीपासूनच वादग्रस्त असल्याने पुतळा उभारण्यात आल्याची माहिती मिळताच गावात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. विशेष म्हणजे, या जागेच्या जवळच वसमत ग्रामीण पोलीस ठाण्याची तात्पुरती पोलीस चौकी असल्याने घटनेची माहिती तत्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच वसमतचे उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार केंद्रे, वसमत शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुधीर वाघ, वसमत ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामदास निरडोडे, तहसीलदार सारंग चव्हाण, कुरुंदा पोलीस ठाण्याचे ठाणेदार पुरी, हट्टा पोलीस ठाण्याचे ठाणेदार संदीप बोरकर यांच्यासह पोलीस व महसूल प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. दरम्यान, हिंगोली जिल्हा पोलीस निरीक्षक श्रेणिक लोढा आणि अपर पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांच्या मध्यस्थीने संबंधित समाजाच्या प्रतिनिधींशी चर्चा करण्यात आली. वादग्रस्त जागेवरून निर्माण झालेला तणाव वाढू नये आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी प्रशासनाने शांततेच्या मार्गाने तोडगा काढण्याचे आवाहन केले. चर्चेनंतर समाजबांधवांनी वादग्रस्त जागेवरील पुतळा तेथून हलवून बौद्ध विहार येथे उभारण्यास सहमती दर्शविली. त्यानंतर समाजबांधवांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा सन्मानपूर्वक बौद्ध विहार येथे नेला. तेथे सामूहिक वंदना घेण्यात आली. त्यानंतर विधीपूर्वक पूजा-अर्चा करून पुतळ्याची प्रतिष्ठापना करण्यात आली. प्रशासन व समाजबांधवांच्या समन्वयातून संवेदनशील प्रश्न शांततेने मार्गी लागल्याने गावातील तणावपूर्ण वातावरण निवळले. यापूर्वीही याच वादग्रस्त जागेवर मातंग समाजाच्या वतीने झेंडा उभारून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली होती. त्यावेळीही प्रशासनाने मध्यस्थी करून परिस्थिती नियंत्रणात आणली होती. त्यामुळे या जागेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आल्यानंतर प्रशासनाने वेळीच हस्तक्षेप करून परिस्थिती हाताळली. दरम्यान, इंजनगावमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडून खबरदारी म्हणून बंदोबस्त ठेवण्यात आला. प्रशासनाच्या मध्यस्थीने आणि समाजबांधवांच्या सहकार्याने प्रश्न शांततेच्या मार्गाने सुटल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.



# पैठणच्या श्रीनाथ कॉम्प्युटर टायपिंग संस्थेला परीक्षा परिषदेचा दणका

## - विद्यार्थ्याचे दोन GCC-TBC निकाल रद्द
## - SSC उत्तीर्ण होण्यापूर्वीच परीक्षेला प्रविष्ट केल्याचे प्रकरण

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**पैठण - प्रतिनिधी**
**तुषार नाटकर**

**छ.संभाजीनगर (पैठण) :** नियमावलीतील शैक्षणिक पात्रतेच्या निकषाचे उल्लंघन करून विद्यार्थ्याला शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) देण्यात आल्याच्या तक्रारीवर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने कारवाई केली आहे. पैठण येथील श्रीनाथ कॉम्प्युटर टायपिंग अँड शॉर्टहँड इन्स्टिट्यूटमधील साहिल गुलाब शेख या विद्यार्थ्याचा जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या GCC-TBC परीक्षेतील इंग्रजी ३० शब्द प्रतिमिनिट आणि इंग्रजी ४० शब्द प्रतिमिनिट या दोन विषयांचा निकाल रद्द करण्यात आला आहे.

या प्रकरणी पिपल्स रिपब्लिकन पार्टीचे पैठण तालुका उपाध्यक्ष तथा दै.लोकशक्तीचे तालुका प्रतिनिधी कैलास शांताराम बर्फे यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे २५ मे २०२६ रोजी तक्रार दाखल केली होती. तक्रारीत नियमावली २०२३, प्रकरण-२, मुद्दा क्र.९.१ नुसार GCC-TBC परीक्षेसाठी विद्यार्थी किमान माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (SSC) परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक असल्याचे नमूद करत संबंधित संस्थेच्या कार्यपद्धतीची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. तक्रारीनुसार, साहिल गुलाब शेख याने जानेवारी २०२६ मध्ये GCC-TBC परीक्षेला प्रवेश घेतला होता. मात्र त्याने SSC परीक्षा फेब्रुवारी २०२६ मध्ये उत्तीर्ण केल्याचे कागदपत्रे तक्रारीसोबत सादर करण्यात आली होती. त्यामुळे जानेवारी २०२६ मध्ये परीक्षा देताना संबंधित विद्यार्थी आवश्यक शैक्षणिक पात्रता पूर्ण करीत होता का, यावर प्रश्न उपस्थित झाला.

या तक्रारीच्या अनुषंगाने परीक्षा परिषदेने संबंधित संस्थेकडून खुलासा मागविला होता. संस्थेकडून ६ जुलै २०२६ रोजी ई-मेलद्वारे तसेच स्वतंत्र पत्राद्वारे खुलासा सादर करण्यात आला. मात्र, हा खुलासा समर्पक व समाधानकारक नसल्याचे परीक्षा परिषदेने आपल्या पत्रात स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे आयुक्त महेश जगन्नाथ चोथे यांच्या डिजिटल स्वाक्षरीने जारी करण्यात आलेल्या पत्रानुसार, साहिल गुलाब शेख याचा जानेवारी २०२६ मधील GCC-TBC परीक्षेतील इंग्रजी ३० श.प्र.मि. (बैठक क्र. ५१०७१५०१६८ आणि इंग्रजी ४० श.प्र.मि. (बैठक क्र. ५१०७१६०१०१ या दोन्ही विषयांची संपादणूक रद्द करण्यात आली आहे.

**केवळ निकाल रद्द करून भागणार नाही-बर्फे**

दरम्यान, परीक्षा परिषदेच्या कारवाईनंतर कैलास बर्फ यांनी संबंधित संस्थेविरुद्धही स्वतंत्र व कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. केवळ विद्यार्थ्याचा निकाल रद्द करणे ही संबंधित संस्थेविरुद्ध प्रभावी कारवाई ठरू शकत नाही, असा दावा त्यांनी केला आहे. संबंधित संस्थेने परीक्षा परिषदेकडे चुकीची, अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी माहिती अथवा कागदपत्रे जाणीवपूर्वक सादर केली असल्यास त्याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी बर्फे यांनी केली आहे. तसेच यापूर्वी डाउनलोड करण्यात आलेली प्रमाणपत्रे अथवा निकालपत्रांबाबतही नियमानुसार कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे. संस्थेची भूमिका तपासल्याशिवाय केवळ विद्यार्थ्यावर कारवाई करून प्रकरण निकाली काढू नये. संबंधित संस्थेविरुद्ध नियमांनुसार शिस्तभंगात्मक कारवाई करावी, तसेच चौकशीत गैरप्रकार सिद्ध झाल्यास लागू कायदेशीर तरतुदींनुसार पुढील कारवाईसाठी प्रकरण सक्षम प्राधिकरण किंवा पोलिसांकडे वर्ग करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

या प्रकरणाचा सविस्तर व कारणासहित अहवाल लेखी स्वरूपात देण्याची मागणी बर्फे यांनी परीक्षा परिषदेसह शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली आहे. परीक्षा पात्रतेच्या नियमांचे उल्लंघन झाले की नाही, संस्थेची भूमिका नेमकी काय होती आणि विद्यार्थ्याला पात्रता नसताना परीक्षेला प्रवेश कसा मिळाला, याबाबत आता पुढील चौकशीकडे लक्ष लागले आहे.

# उपवर्गीकरण विरोधी महामोर्चात सहभागी होण्याचे बा.रा.वाघमारे यांचे मातंग समाजाला आवाहन

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**उस्माननगर - प्रतिनिधी**
**लक्ष्मण कांबळे**

**नांदेड/उस्माननगर :** आरक्षणाचे उपवर्गीकरण म्हणजे अनुसूचित जाती समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न आहे, आणि ही फुट मातंग समाजासाठी फार मोठी धोक्याची आहे,कारण यातून समाजाचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे,म्हणून नांदेडमध्ये निघणारा ९ ऑगस्टचा उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा म्हणजे आपला मोर्चा आहे, असं समजून,जो येईल, त्याला सोबत घेऊन या मोर्चात हजारोच्या संख्येने मातंग समाजाने आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सचे संस्थापक बा.रा.वाघमारे यांनी केले आहे.

आरक्षण उपवर्गीकरण विरोधी महामोर्चास अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सचा जाहीर पाठिंबा असल्याचे यापूर्वीच अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सच्या प्रदेश महासचिव अॅड, सुजाता पोहरे यांनी जिल्हाधिकारी नांदेड आणि जिल्हा पोलीस अधीक्षक नांदेड यांना निवेदनाद्वारे कळविले आहे, बौद्धांसोबत भांडायची ही वेळ नसून बौद्धांच्या खांद्याला खांदा लावून लढायची ही वेळ आहे, आरक्षण उपवर्गीकरणाचा डाव आपल्याला हाणून पाडायचा आहे, त्यासाठी मातंग बांधवांनी आरक्षण उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा हा आपला मोर्चा आहे ,असं समजून मातंग समाजाने या महामोर्चात आपला सहभाग नोंदवावा,असे आवाहन बा.रा.वाघमारे यांनी महामोर्चाच्या तयारीच्या दृष्टीने होणाऱ्या विविध सभांमधून आणि बैठकांमधून केले आहे.

# वाढदिवसानिमित्त राजेंद्र जैन यांना शुभेच्छांचा वर्षाव

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**नागपूर - प्रतिनिधी**

**नागपूर/गोंदिया :** राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यसभा सदस्य राजेंद्र जैन यांच्या वाढदिवसानिमित्त ८ ऑगस्ट २०२६ रोजी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी कार्यकर्ते, पदाधिकारी, समर्थक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यावेळी जैन यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला आणि त्यांना वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. राजेंद्र जैन यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते आणि समर्थकांनी उपस्थित राहून त्यांच्या दीर्घायुष्याची व निरोगी आयुष्याची सदिच्छा व्यक्त केली. यावेळी उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

विदर्भातील राजकीय व सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या जैन यांना शुभेच्छा देण्यासाठी दिवसभर नागरिक व कार्यकर्त्यांची भेटीगाठी सुरू होत्या. 'राजेंद्र जैन साहेबांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!' अशा घोषणांनी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. राजेंद्र जैन यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानत मिळणारे प्रेम व शुभेच्छा हीच आपली खरी ताकद असल्याचे सांगितले.



छायाचित्र : वाढदिवसानिमित्त राजेंद्र जैन यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना कार्यकर्ते व समर्थक

# वीज ग्राहकांना २४ तास वीजपुरवठा करा

## आमदार बोंढारकरांचा महावितरण अधिकाऱ्यांना दम

## डीपी जळाल्यास तातडीने बदलण्याचे निर्देश

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नांदेड - प्रतिनिधी

**नांदेड :** नांदेड शहरासह ग्रामीण भागातील कृषी, व्यावसायिक तसेच सर्वसामान्य वीज ग्राहकांना सुरळीत व २४ तास वीजपुरवठा करण्यात यावा. रखडलेली वीजविषयक कामे तातडीने पूर्ण करावीत. कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिला.

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील वीजपुरवठ्याच्या विविध प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी आमदार बोंढारकर यांनी तरोडा नाका येथील महावितरणच्या कार्यालयात संयुक्त बैठक घेतली. या बैठकीस अधीक्षक अभियंता संजय खंडारे, कार्यकारी अभियंता शैलेश कलंत्री, अतिरिक्त कार्यकारी अभियंता एस.एन.कांबळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि नांदेड दक्षिण मतदारसंघातील सर्व लाईनमन उपस्थित होते.

नांदेड दक्षिण मतदारसंघात वीजपुरवठा सुरळीत होत नसल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त होत आहेत. या मतदारसंघात एमआयडीसीसह अनेक उद्योग-व्यवसाय आहेत. तसेच मोठ्या प्रमाणावर शेती असून सिंचनासाठी वीजपुरवठा महत्त्वाचा आहे. लघु व्यावसायिक आणि सर्वसामान्य ग्राहकांनाही सुरळीत वीज मिळणे आवश्यक आहे. मात्र, वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने उद्योग-व्यवसाय, शेतीचे सिंचन आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

एखाद्या परिसरातील डीपी जळाल्यानंतर तो अनेक दिवस बदलला जात नसल्याने संबंधित भागातील वीजपुरवठा अनेक दिवस विस्कळीत राहतो. डीपी बसवल्यानंतरही वीजपुरवठा वारंवार खंडित होण्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे जळालेले डीपी तातडीने बदलून नवीन डीपी बसवावेत, अशा सूचना



आमदार बोंढारकर यांनी दिल्या.

मतदारसंघातील सर्व वीज उपकेंद्रांशी संबंधित प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत. नवीन सर्व्हिस स्टेशनची कामे वेळेत पूर्ण करावीत. शेतीपंपासाठीचा वीजपुरवठा आणि सामान्य ग्राहकांसाठीचा वीजपुरवठा याबाबत आवश्यक ती स्वतंत्र व्यवस्था करून ग्राहकांना सुरळीत वीज उपलब्ध करून द्यावी, असेही त्यांनी सांगितले.

**ग्राहकांना त्रास झाल्यास कारवाई अटळ**

सर्वसामान्य वीज ग्राहकांना समाधानकारक सेवा देणे ही महावितरणची जबाबदारी आहे. ग्राहकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यास कोणतीही हयगय केली जाणार नाही. नियोजित वेळेत कामे पूर्ण करून ग्राहकांना दिलासा द्यावा, असा स्पष्ट इशारा आमदार बोंढारकर यांनी बैठकीत दिला.

बैठकीस शिवसेना शहरप्रमुख तुलजेश यादव, युवासेना जिल्हाप्रमुख बाळु पाटील मोरे, महानगरप्रमुख दिपक स्वामी, संतोष जाधव, सहायक अभियंते बळीराम तोडेवाड, तुषार वाघमारे, पुंजाजी साखरे, दालधन मोरे, प्रियांका तामलवाड, राखे यांच्यासह नांदेड दक्षिण मतदारसंघातील महावितरणचे सर्व लाईनमन उपस्थित होते.

# पवनचक्कीचे साहित्य चोरणाऱ्या सराईत टोळीचा धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेकडून पर्दाफाश; चौघे जेरबंद

* पवनचक्कीचे कॉपर केबल, कॉपर रॉड व तार चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश;
* रुपये ४.४८ लाखांचा मुद्देमाल जप्त, ४ गुन्ह्यांची उकल
* धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार नेतृत्वाखाली मोठी कार्यवाही

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
धाराशिव - प्रतिनिधी
समीर मुल्ला

**धाराशिव :** धाराशिव जिल्ह्यासह परिसरातील पवनचक्की प्रकल्पांमधील विद्युत साहित्य चोरी करणाऱ्या सराईत टोळीचा धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी या कारवाईत चार आरोपींना ताब्यात घेत पवनचक्कीचे कॉपर केबल, कॉपर रॉड, तार तसेच गुन्ह्यात वापरलेली बोलेरो जीप असा एकूण सुमारे ४ लाख ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे पवनचक्की साहित्य चोरीचे तब्बल चार गुन्हे उघडकीस आले आहेत.

धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मालमत्तेविषयक गुन्ह्यांचा उघडकीस आणण्यासाठी गस्त व पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी पोलिस पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, अणसुर्डा-शिवारातील फॉरेस्ट परिसरात पवनचक्कीचे पाइप व साहित्य चोरी करणारी टोळी दाट झाडीमध्ये थांबलेली आहे.

माहिती मिळताच पोलिसांनी फॉरेस्ट परिसराच्या जवळ जाऊन संशयित वाहनाच्या हालचालींवर लक्ष ठेवले. काही इसम दाट झाडीतून बाहेर पडताना पोलिसांना दिसले. पोलिसांची चाहूल लागताच त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिस पथकाने त्यांचा



### चार चोरीचे गुन्हे उघडकीस

आरोपींची चौकशी केल्यानंतर त्यांच्या सहभागातून पवनचक्की साहित्य चोरीचे एकूण चार गुन्हे उघडकीस आले आहेत. या प्रकरणी पोलिस ठाणे वाशी आणि येरमाळा येथे गुन्हे दाखल असल्याची माहिती तपासात समोर आली आहे.

पाठलाग करून अत्यंत शिताफीने चौघांना ताब्यात घेतले.

ताब्यात घेतलेल्या संशयितांकडे पोलिसांनी चौकशी केली असता त्यांनी धाराशिव जिल्ह्यात तसेच जिल्ह्याबाहेर पवनचक्कीचे साहित्य चोरी केल्याची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्याकडून सखोल चौकशी केली असता खामकरवाडी येथील त्यांच्या नवीन बांधकामाच्या ठिकाणी पवनचक्कीचे साहित्य लपवून ठेवल्याचे समोर आले. पोलिसांनी खामकरवाडी येथे जाऊन तपासणी केली असता तेथे कॉपर केबल वायर, कॉपर रॉड, तार आदी पवनचक्कीचे साहित्य आढळून आले. हे साहित्य पोलिसांनी पंचनामा करून जप्त केले.

**चार आरोपी पोलिसांच्या ताब्यात**

या प्रकरणात अनिल नाना काळे, वय ४० वर्षे, रा. मस्सा नंदू रामा शिंदे, वय ४२ वर्षे, रा. खामकरवाडी, बब्बल ऊर्फ राम शिवाजी शिंदे, वय २९ वर्षे, रा. खामकरवाडी,शाम ऊर्फ बाबा शंकर शिंदे, वय २८ वर्षे, रा. खामकरवाडी या चौघांना ताब्यात घेऊन पवनचक्कीचे कॉपर केबल वायर, कॉपर रॉड, तार तसेच गुन्ह्यात वापरलेली बोलेरो जीप असा एकूण रू४,४८,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे पवनचक्की प्रकल्पांमधून महागडे विद्युत साहित्य चोरी करणाऱ्या टोळीला मोठा धक्का बसला असून, या टोळीने आणखी कोणत्या ठिकाणी चोरी केली आहे का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

सदर कारवाई ही धाराशिव पोलिस अधीक्षक रेतू खोखर, अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विनोद इज्जपवार ज्जनवार, यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खुटके, तसेच पोलिस हवालदार विनोद जानराव, नितीन जाधवर, दयानंद गादेकर, पोलिस नाईक बबन जाधवर, पुष्कर मुंढे, चालक पोलिस हवालदार मेहबूब अरब, प्रकाश बोईनवाड आणि रोहित दंडनाईक यांच्या पथकाने केली.

# स्वातंत्र्य दिन उंबरठ्यावर; जिल्हा परिषदेच्या चिमुकल्यांचा दुसरा गणवेश अन बूट - मोजे कागदावरच!

## दीड महिना उलटला, तरी सुविधांचा पत्ता नाही; ऐन पावसाळ्यात विद्यार्थी मोजे- बुटाविना

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मंठा - प्रतिनिधी
सुरेश ज्ञा. दवणे

**जालना (मंठा) :** जिल्हा परिषदेच्या शाळा म्हणजे केवळ विटा-मातीच्या भिंती नव्हेत, तर ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी कुटुंबातील मुलांच्या भवितव्याला आकार देणारी केंद्रे आहेत. या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबत आवश्यक शैक्षणिक सुविधा देण्याचा दावा शासनाकडून सातत्याने केला जातो. मात्र, योजनांची अंमलबजावणी कागदावर आणि प्रत्यक्षात मात्र चिमुकल्यांच्या वाट्याला गैरसोय, अशी परिस्थिती मंठा तालुक्यात निर्माण झाल्याचे चित्र आहे.

शैक्षणिक वर्ष सुरू होऊन दीड ते पावणेदोन महिने उलटले असून १५ ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. तरीही तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील पात्र विद्यार्थ्यांना बूट -मोजे व दुसऱ्या गणवेशासाठीचा निधी अद्याप मिळालेला नसल्याची बाब समोर येत आहे. त्यामुळे स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमातही अनेक चिमुकले अपेक्षित बूट -मोजे व शालेय गणवेशाअभावी राहण्याची शक्यता आहे.

**'एक गणवेश मिळाला; दुसऱ्याची प्रतीक्षा कायम!**

शासनाच्या योजनेनुसार विद्यार्थ्यांना दोन गणवेश देण्याची तरतूद आहे. मात्र, एका गणवेशासाठी मंजूर असलेली रू.३००ची रक्कमही सध्याच्या महागाईच्या तुलनेत अत्यंत तुटपुंजी असल्याची पालकांची भावना आहे. त्यातच दुसऱ्या गणवेशासाठीचा निधी वेळेत उपलब्ध न झाल्याने विद्यार्थ्यांना एकाच गणवेशावर शैक्षणिक वर्षाची सुरुवात करावी लागत आहे. विशेष म्हणजे, बूट आणि मोज्यांसाठी प्रतिविद्यार्थी रू.१७०ची तरतूद असतानाही त्याचा लाभ विद्यार्थ्यांना अद्याप मिळालेला नसल्याची तक्रार आहे. ऐन पावसाळ्यात ग्रामीण भागातील चिखलमय, दगडधोंड्यांचे आणि काट्याकुट्यांचे रस्ते तुडवत शाळेत जाणाऱ्या चिमुकल्यांच्या पायात बूट नसणे ही प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब आहे.

**योजनाचा गाजावाजा प्रत्यक्षात प्रतीक्षा!**

शासनाच्या योजनांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध सुविधा जाहीर केल्या जातात. मात्र, त्या सुविधा वेळेत विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नसतील तर योजनांचा नेमका लाभ कोणाला मिळतो, असा सवाल पालकांकडून उपस्थित होत आहे. १५ जूनपासून



शाळा सुरू झाली; मात्र ऑगस्ट महिना उजाडला तरी गणवेश, बूट-मोज्यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी विद्यार्थ्यांना प्रतीक्षा करावी लागत असेल, तर प्रशासनाच्या नियोजनाचा आणि निधी वितरणाच्या यंत्रणेचा आढावा घेण्याची गरज आहे.

गरीब कुटुंबातील मुलांना शाळेत येताना मूलभूत सुविधा मिळाव्यात, यासाठी शासन निधी उपलब्ध करून देते. मग हा निधी वेळेत शाळांपर्यंत आणि विद्यार्थ्यांपर्यंत का पोहोचत नाही? निधी वितरणात विलंब नेमका कुठे होतो? याची जबाबदारी निश्चित होणार का, असा सवाल आता पालकांकडून उपस्थित होत आहे.

**स्वातंत्र्यदिनापूर्वी तरी प्रशासन जागे होणार का?**

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने शाळांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. एका बाजूला देशाच्या स्वातंत्र्याचा उत्सव साजरा केला जाणार, तर दुसऱ्या बाजूला ग्रामीण भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांना गणवेश आणि बूट-मोज्यांसाठी प्रतीक्षा करावी लागत असेल, तर ही विसंगती प्रशासनाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

दुसऱ्या गणवेशाचा निधी आणि बूट-मोज्यांचा निधी तातडीने उपलब्ध करून देऊन विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करावी, तसेच निधी वितरणास झालेल्या विलंबाची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी पालकांकडून होत आहे.

# इंदापूर नगरपालिकेच्या कृष्णा-भीमा विकास आघाडीकडून अक्षय गानबोटे यांची स्वीकृत नगरसेवकपदी निवड

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
इंदापूर - प्रतिनिधी
बापू बोराटे

**पुणे (इंदापूर) :** इंदापूर नगरपालिकेतील कृष्णा-भीमा विकास आघाडीचे स्वीकृत नगरसेवक संजय शिंदे यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर त्यांच्या जागी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रदीप गारटकर तसेच भारतीय जनता पक्षाचे युवा नेते, पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम व आरोग्य सभापती प्रवीण माने यांचे अत्यंत विश्वासू सहकारी अक्षय संतोष गानबोटे यांची कृष्णा-भीमा विकास आघाडीकडून स्वीकृत नगरसेवकपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे इंदापूर शहरासह संपूर्ण तालुक्यात स्वागत होत असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे. अक्षय गानबोटे हे सामाजिक, राजकीय आणि जनसंपर्काच्या माध्यमातून सातत्याने कार्यरत राहिले आहेत. शहरातील विविध विकासकामांमध्ये तसेच



सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी वेळोवेळी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत कृष्णा-भीमा विकास आघाडीने त्यांच्यावर स्वीकृत नगरसेवकपदाची जबाबदारी सोपविली असल्याचे मानले जात आहे.

स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड झाल्यानंतर इंदापूर शहरातील विविध भागांमध्ये त्यांचा सत्कार करण्यात येत आहे. सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी, विविध संघटनांचे पदाधिकारी, भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते तसेच विविध राजकीय पक्षांतील मान्यवरांनी पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान केला. अनेकांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत शहराच्या विकासासाठी प्रभावी भूमिका बजावण्याचा विश्वास व्यक्त केला.

यावेळी बोलताना अक्षय गानबोटे म्हणाले, 'माझ्यावर दाखविलेल्या विश्वासाबद्दल मी कृष्णा-भीमा विकास आघाडीतील सर्व नेते, पदाधिकारी आणि नगरसेवकांचा मनापासून ऋणी आहे. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रदीप गारटकर आणि युवा नेते प्रवीण माने यांच्या मार्गदर्शनाखाली इंदापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे. नागरिकांच्या समस्या सोडविणे, मूलभूत सुविधा अधिक सक्षम करणे आणि विकासकामांना गती देणे यासाठी मी सदैव कटिबद्ध राहीन.' त्यांच्या निवडीमुळे भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. आगामी काळात इंदापूर शहरातील विकासकामे अधिक वेगाने मार्गी लागण्यासाठी अक्षय गानबोटे यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास अनेक मान्यवरांनी व्यक्त केला.

# टी जे चौहान विद्यालयात देशभक्तीचा जागर



दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नाशिक - प्रतिनिधी
समाधान भावनाथ

**नाशिक :** श्रीमान टी. जे. चौहान (बिटको) माध्यमिक विद्यालय, मोरवाडी, सिडको, नाशिक येथे ८ ऑगस्ट रोजी क्रांती दिनाचे औचित्य साधून समरगीत स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या पार पडलेल्या समूहगीत स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी छान छान देशभक्तीपर गीते सादर केली. शाळेतील इयत्ता ५ वी च्या चारही तुकड्यांमध्ये झालेल्या या चुरशीच्या स्पर्धेत पाचवी 'अ' च्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर इयता ६वी-क, ७वी क आणि ड ,८ वी ब या वर्गानी बाजी मारली.

विद्यार्थ्यांनी तिरंग्याच्या वेशभूषेत देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. माळी मॅडम यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे आणि वर्गशिक्षकांचे,पालकांचे अभिनंदन केले. यावेळी शाळेचे पर्यवेक्षक डी. बी. अहिरे सर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेचे परीक्षण संगीत शिक्षिका सौ.मोराणकर मॅडम यांनी केले.या प्रसंगी परीक्षकांने एक सुंदर गाणे सादरीकरण केले.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी मोरे यांनी केले. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्याना वर्गशिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

सिडकोतील श्रीमान टी.जे. चौहान (बिटको) माध्यमिक विद्यालय, मोरवाडी येथे समूहगीत स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल विद्यार्थी पारितोषिकासह.

## सुविचार

स्वप्ने पाहा आणि
ती पूर्ण करण्याचा
प्रयत्न करा;
अपयश हा
यशाच्या मार्गातील
फक्त एक टप्पा
आहे.


## वाचकांना विनम्र सूचना

दै.चालु वार्ता वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजुकराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची दै.चालु वार्ता वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.चालु वार्ता वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# राजसत्तेला धर्मसत्तेची जोड देणारी लोकमाता अहिल्यादेवी होळकर -आ.संजय कुटे

## जळगाव जामोद तालुक्यातील मानेगावात 'अहिल्या संदेश रथयात्रे'चे उत्स्फूर्त स्वागत; 'अहिल्यादेवींच्या विचारांचा गजर' कार्यक्रम उत्साहात

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
जळगाव जामोद प्रतिनिधी
विनोद वानखडे

**जळगाव जामोद :** पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २३१ व्या पुण्यतिथीनिमित्त संपूर्ण जिल्ह्यात सुरू असलेल्या 'अहिल्या संदेश रथयात्रे'चे मानेगाव येथे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यानिमित्त आदर्श विद्यालय, मानेगाव येथे 'अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांचा गजर' हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा आणि विचारांचा संदेश समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात या रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. मानेगाव येथे रथयात्रेचे आगमन होताच ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले. नागरिकांनी अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. त्यानंतर गावातून रथयात्रेची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

**अहिल्यादेवींच्या विचारांचा गजर**

मिरवणुकीनंतर आदर्श विद्यालय, मानेगाव येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार



संजयजी कुटे होते. यावेळी बोलताना त्यांनी लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करताना 'राजसत्तेला धर्मसत्तेची जोड देणारी लोकमाता अहिल्यादेवी होळकर होत्या,' असे प्रतिपादन केले. अहिल्यादेवींनी आपल्या कार्यकाळात जनकल्याणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. समाजातील सर्व घटकांच्या हिताचा विचार करून त्यांनी प्रशासनाचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या कार्यातून सेवा, न्याय, धर्मनिष्ठा आणि लोककल्याणाचा संदेश मिळतो, असे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

**मान्यवरांची उपस्थिती**

कार्यक्रमाला सचिन बाप्पू देशमुख, शरदभाऊ वसतकार, बंडूभाऊ पाटील, संजयजी पांडव, अविनाश उमरकर, शत्रुघ्नभाऊ पाचपोर, कैलासभाऊ डांगे, अशोकराव देवकते, अनंत बोरसे, गजाननभाऊ सरोदे, विश्वास पाटील, वामनराव फंड, वसंत मिरगे, किसनराव बाठे, नाजूक सुलताने, मनोहर पाचपोर, मुख्याध्यापक नेमाडे सर, प्रकाश जुमळे, भारतभाऊ वाघ आणि संतोष चिकटे यांच्यासह पंचक्रोशीतील अहिल्या प्रेमी नागरिक उपस्थित होते. यावेळी निलेश साबे, अशोक साबे, विठ्ठल सुशिर, विजय काळदाते, अमित भिवटे, प्रमोद तीतरे, अजय तीतरे, हरिदासभाऊ वसतकार, शिवदास कात्रे आणि सुनील भिवटे यांच्यासह अनेक नागरिकांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली.

**मनोहर खाळपे मित्र मंडळींचे आयोजन**

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन मनोहर खाळपे मित्र मंडळींच्या वतीने करण्यात आले. आयोजनासाठी बाबुराव खाळपे, अंबादास खाळपे, भिकाभाऊ भिवटे, सहदेव फंड, वासुदेवराव पाटील, विजय खाळपे, राजू खाळपे, दिलीप गाडगे, संदीप वसतकार, रोशन वसतकार, संतोष गव्हाळे, अमोल वसतकार, परमेश्वर सुशिर, निळू सुशिर, गणेश बोंद्रे, शहादेव भिवटे, ज्ञानेश्वर खाळपे, अनिल गावंडे, संतोष पाचपोर, निखिल बाजोडे, वरणकार मामा, संतोष इंगळे आणि विकास पाखरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर खाळपे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक नेमाडे सर यांनी केले. अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांचा आणि लोककल्याणकारी कार्याचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविणाऱ्या या उपक्रमाला मानेगाव परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# महिलांनी केवळ बचत गटापुरते मर्यादित न राहता उद्योजिका व्हावे

## शासकीय योजनांचा लाभ घेत आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल करण्याचे आवाहन

### लोकसंचालित साधन केंद्राची १६ वी वार्षिक सभा उत्साहात

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**वाशिम - प्रतिनिधी**
**प्रताप नागरे**

**वाशिम :** महिलांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी केवळ बचत गटांच्या माध्यमातून बचतीपुरते मर्यादित न राहता उपलब्ध शासकीय योजनांचा प्रभावीपणे लाभ घेत उद्योजकतेकडे वाटचाल करावी. उद्योगाच्या माध्यमातून स्वतःची आर्थिक ओळख निर्माण करून कुटुंबासह समाजाच्या आर्थिक विकासात योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे यांनी केले.

लोकसंचालित साधन केंद्र, वाशिमची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा श्री विठ्ठलवाडी मंगल कार्यालय येथे उत्साहात पार पडली. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताना वर्षा खोब्रागडे यांनी 'सत्ता, संपत्ती आणि समान संधी' हे महिला आर्थिक विकास महामंडळाचे ब्रीदवाक्य असल्याचे सांगितले. महिलांना समान व न्याय्य संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठेची गरज**

सभेत केंद्राच्या अध्यक्षा सविता सुनील चौधरी यांनी सन २०२५-२६ या वर्षातील कामकाजाचा आढावा सादर केला. तसेच सन २०२६-२७ साठीचे नियोजन सभेसमोर मांडले.



नाबार्डचे जिल्हा प्रबंधक शंकर कोकडवार यांनी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून उपलब्ध विविध योजनांचा लाभ घेऊन महिलांनी लघु तसेच मोठे उद्योग उभारावेत, असे आवाहन केले. महिला बचत गटांकडून उत्पादित होणाऱ्या वस्तूंना व्यापक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आकर्षक पॅकेजिंग, लेबलिंग आणि ब्रँडिंग यावर विशेष भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. उत्पादन चांगले असण्याबरोबरच त्याची प्रभावी विक्री व्यवस्था उभी राहणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

**PMFME योजनेत ३५ टक्के अनुदानाची संधी**

PMFME योजनेचे प्रतिनिधी मुठाळ यांनी योजनेची सविस्तर माहिती दिली. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना ३५ टक्के अनुदानाची तरतूद असून, महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उपलब्ध संधीचा उपयोग उद्योग उभारणीसाठी करावा, असे आवाहन करण्यात आले.

दरम्यान, बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखा व्यवस्थापकांनी महिला बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी लोकसंचालित साधन केंद्र आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांच्यातील सामंजस्य कराराच्या माध्यमातून कर्जपुरवठ्यासाठी सहकार्य करण्याची भूमिका स्पष्ट केली.

**पोकरा २.० मधूनही महिलांना संधी**

पोकरा योजनेचे सोहम बेलोकर यांनी पोकरा २.० अंतर्गत गावांसाठी उपलब्ध असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. या योजनांमध्ये उपलब्ध अनुदानाचा लाभ घेऊन महिला बचत गटांनी विविध आर्थिक उपक्रम सुरू करावेत आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना द्यावी, असे त्यांनी सांगितले.

**उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा गौरव**

वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या उद्योजिका, उत्कृष्ट सीआरपी तसेच उत्कृष्ट गाव विकास समितीचा सत्कार करण्यात आला. महिलांनी विविध क्षेत्रांत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन देण्यात आले.

यावेळी माविमचे लेखाधिकारी संकेत महाजन, वैभव काळमेघ, पुरुषोत्तम हातोलकर, राहुल मोकळे, प्रमोद गोरे, साधना मुळे यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच महिला बचत गटांच्या प्रतिनिधींची उपस्थिती होती. सर्वसाधारण सभा यशस्वी करण्यासाठी केंद्र व्यवस्थापक, लेखापाल, उपजीविका सल्लागार, सहयोगिनी, सीआरपी तसेच एफपीओ व्यवस्थापक व लेखापाल यांनी परिश्रम घेतले.

महिलांच्या हाताला रोजगार, उद्योगाला बाजारपेठ आणि उद्योगाला आर्थिक पाठबळ मिळाले, तर ग्रामीण भागातील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचा मार्ग अधिक सुकर होणार आहे. त्यामुळे शासकीय योजनांची माहिती केवळ कागदावर न राहता ती प्रत्यक्ष उद्योग उभारणीपर्यंत पोहोचणे हीच या उपक्रमाची खरी फलश्रुती ठरणार आहे.




(पान १ वरून ...☞)

### आम्ही थंड होणार नाहीत...

मंत्र्याचा राजीनामा घेतला म्हणून चालणार नाही. आता सिस्टिम बददली पाहिजे. सरकार बदललं पाहिजे.

उद्धव ठाकरे यांनी थेट आता सरकार बदलण्याची वेळ आल्याच म्हटले. जेंनजीच्या आंदोलनात उद्धव ठाकरे सरकारवर टीका करताना दिसले. यासोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल शिवसेना ठाकरे गटातून बंडखोरी करून शिवसेना शिंदे गटात दाखल झालेल्या खासदारांची भेट घेतली. यावेळी त्यांनी या खासदारांसोबत स्वतंत्र संवाद साधल्याचीही माहिती मिळतंय. त्यावरच उद्धव ठाकरे यांनी जोरदार टीका केली. विद्यार्थ्यांना भेटण्यासाठी मोदींना वेळ नाही, फुटीर खासदारांना भेटण्यासाठी त्यांच्याकडे वेळ आहे.


# 'ती' एक न समजलेला शब्द' कादंबरीला वाचकांचा उदंड प्रतिसाद

## नातेपुतेच्या लेखक सुरजकुमार गणगे यांच्या साहित्यकृतीची राज्यभर चर्चा

### घरपोच पार्सलची सुविधाही उपलब्ध

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**माळशिरस - प्रतिनिधी**
**राजेंद्र पिसे**

**नातेपुते :** येथील युवा लेखक सुरजकुमार गणगे लिखित आणि 'प्रतिसूर पब्लिकेशन'द्वारे प्रकाशित झालेल्या 'ती' एक न समजलेला शब्द' या मराठी कादंबरीला वाचकांकडून उत्स्फूर्त आणि भरभरून प्रतिसाद मिळत आहे. अल्पावधीतच या कादंबरीने वाचकांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले असून, साहित्यप्रेमींकडून लेखकाच्या लेखनशैलीचे विशेष कौतुक होत आहे.




प्रेम, नाती, भावभावना, मानवी स्वभाव आणि जीवनातील अनेक संवेदनशील पैलू यांचा सुरेख वेध या कादंबरीत घेण्यात आला आहे. साधी, ओघवती, प्रभावी आणि थेट वाचकांच्या मनाला भिडणारी भाषा हे या कादंबरीचे विशेष आकर्षण ठरत आहे. त्यामुळे तरुण वाचकांसह ज्येष्ठ वाचकांनाही ही कथा आपलीशी वाटत आहे.

कादंबरीतील प्रवाही कथानक, जिवंत व्यक्तिरेखा, भावनिक प्रसंग आणि वास्तव जीवनाशी साधर्म्य साधणारी मांडणी यामुळे वाचक कथेशी एकरूप होत असल्याचे चित्र आहे. पुस्तक वाचल्यानंतर अनेक वाचकांकडून मिळणाऱ्या सकारात्मक प्रतिक्रिया आणि कौतुकामुळे लेखक सुरजकुमार गणगे यांचा साहित्यिक प्रवास अधिक बळकट होत आहे.

मराठी वाचनसंस्कृतीला चालना मिळावी आणि दर्जेदार साहित्य अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने ही कादंबरी प्रकाशित करण्यात आली आहे. वाचकांकडून मिळणारे प्रेम, कौतुक आणि प्रोत्साहन ही पुढील साहित्यनिर्मितीसाठी मोठी प्रेरणा असल्याचे लेखक सुरजकुमार गणगे यांनी सांगितले.

**राज्यभर घरपोच पार्सलची सुविधा**

'ती' एक न समजलेला शब्द' ही कादंबरी वाचकांसाठी उपलब्ध असून, महाराष्ट्रातील विविध भागांतील वाचकांसाठी पार्सलद्वारे घरपोच पुस्तक पाठविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. साहित्यप्रेमींनी या कादंबरीचा आस्वाद घेण्यासाठी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पुस्तक मागविण्यासाठी संपर्क : ८०१०७०२३६६

# जावळी/मुगळेवाडी च्या इतिहासात प्रथम आदर्श सरपंच पुरस्कार प्राप्त सुरेखा यादव...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**औसा - प्रतिनिधी**
**जीवन जाधव**

**औसा :** औसा तालुक्यातील जावळी/मुगळेवाडी गावच्या सरपंच सौ सुरेखा मोहनराव यादव यांना दैनिक चालु वार्ता दैनिकाचा वर्धापन दिनाचे औचित्य साधून वर्धापनदिनानिमित्त गौरव सरपंचांचा करण्यात आला. यावेळी जावळी/ मुगळेवाडी गावासाठी दिलेले योगदान व लोकाभिमुख लोकांसाठी केलेले कार्य पाहून सरपंच सुरेखा यादव यांना आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वीय सहायक मंगेश चिवटे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान...

सरपंच सुरेखा यादव यांनी जावळी मुगळेवाडी गावच्या ग्रामपंचायतीच्या सरपंच म्हणून अनेक लोकोपयोगी कामे केल्याने व गावात विकासकामे केल्याने व सर्वात महत्वकांक्षी असलेलं पाणीपुरवठा योजनेसाठी आपल्या शेतातील पीक वाळवून गावा साठी शेतीतील पाणी उपलब्ध करून दिल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन झालं होतं. चावी गावात सक्षमपणे जल जीवन मिशन योजना सह अनेक लोकोपयोगी विकास कामे केल्याने दैनिक चालु वार्ता वृत्तपत्राच्या वतीने आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित करण्यात आला आहे.. जावळी मुगळेवाडीच्या सरपंच महिला असल्याने त्यांनी गावातील महिलांच सक्षमीकरण करण्यासाठी गावातील बचत गट आशा कार्यकर्ता सह महिलांसाठी अनेक उपक्रम राबवत ग्रामपंचायत माध्यमातून गावातील जिल्हा परिषद शाळा अंगणवाडी डिजिटल करण्यासाठी ग्रामपंचायत माध्यमातून वेळोवेळी शिक्षणाला प्राधान्य दिल्याने व यापुढेही जावळी/मुगळेवाडी ग्रामपंचायत माध्यमातून जनतेची सेवा करण्याचा यावेळी संकल्प केला आहे यावेळी जावळी मुगळेवाडी ग्रामस्थ अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# 'जुग जुग जिओ' अभियानातून अवयवदानाचा संदेश

## नामदेवराव जगताप अध्यापक विद्यालयात अवयवदान पंधरवड्याचा उत्साहात प्रारंभ

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**करमाळा - प्रतिनिधी**

**करमाळा :** अवयवदान हे महादान असून, एका व्यक्तीच्या अवयवदानामुळे अनेकांना नवजीवन मिळू शकते, या मानवतावादी संदेशातून 'जुग जुग जिओ' अभियानांतर्गत अवयवदान पंधरवडा ३ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात येत आहे. या अभियानाचा प्रारंभ नामदेवराव जगताप अध्यापक विद्यालय, करमाळा येथे जनजागृतीपर कार्यक्रमाने करण्यात आला. यावेळी अवयवदानाचे महत्त्व, अवयवदानाबाबत असलेले गैरसमज, अवयवदानाची प्रक्रिया तसेच मृत्यूनंतर अवयवदान करून गरजू रुग्णांना जीवनदान कसे देता येते, याबाबत उपजिल्हा रुग्णालय, करमाळा येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ.वेदपाठक मॅडम यांनी उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थ्यांना सविस्तर व मोलाचे मार्गदर्शन केले.




कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.वेदपाठक मॅडम तसेच उपजिल्हा रुग्णालयातील उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत प्राचार्य मिलिंद फंड सर यांनी केले. यावेळी त्यांनी अवयवदानासारख्या सामाजिक आणि मानवतावादी उपक्रमांची जनजागृती शैक्षणिक संस्थांमधून होणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थ्यांना अवयवदानाची शपथ देण्यात आली. अवयवदानाबाबत समाजामध्ये सकारात्मक विचार निर्माण करून अधिकाधिक नागरिकांनी या महान कार्यासाठी पुढे यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमास नामदेव जगताप अध्यापक विद्यालयाचे प्राध्यापक बाळासाहेब नरारे, जाकीर शेख, जवंजाळ सर, तसेच उपजिल्हा रुग्णालयातील सुहास आगलावे, परिचारिका श्रीमती छाया शिंदे, समुपदेशक विकास लिंगराज यांच्यासह रुग्णालयातील कर्मचारी, विद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य मिलिंद फंड यांनी आपले मनोगत व्यक्त करून अवयवदानाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी विद्यार्थ्यांनी स्वतः अवयवदानाबाबत माहिती घेऊन ती आपल्या कुटुंबीयांपर्यंत व समाजापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कपिल भालेराव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.बाळासाहेब नरारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन जाकीर शेख यांनी मानले. अवयवदानाविषयी समाजामध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 'अवयवदान करा, जीवनदान द्या' या संदेशातून मानवतेची ही चळवळ अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

## चुटकुले

रात्रीची उशीराची वेळ.....

एक बाई शेजारणीस- 'वहिनी, आमचे हे आत्ताच आलेत जरा लाटणं देता का?'

शेजारीण- 'हो, घेऊन जा की, पण लवकर परत दया आमचे हे देखील थोडयाच वेळात येतील.....'

अशा प्रकारे दोघीही आपापल्या नवऱ्याला गरम गरम चपात्या वाढतात.

चांगले संस्कार बघुन डोळे भरून आले. तुम्हाला वेगळे विचार आले आसतील..सगळ्या बायका तशा नसतात. .

विचार बदला देश बदलेल

(पान १ वरून ...☞)

### पुणे पोलिसांच्या 'धिंड पॅटर्न' ला ब्रेक!

घडल्यास संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असा इशाराही पोलिस आयुक्तांनी दिला आहे. प्रत्येक पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या सूचनांची अंमलबजावणी होत असल्याची खात्री करून त्याची नियमित नोंद ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

**आयुक्तांच्या प्रमुख मार्गदर्शक सूचना**

✻ आरोपीची धिंड काढणे किंवा सार्वजनिक अपमान होईल अशी वागणूक देऊ नये.

✻ आरोपीचे फोटो, व्हिडिओ किंवा दृश्यफिती समाजमाध्यमांवर प्रसिद्ध होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

✻ अटक ते न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बीएनएसएस-२०२३ व मानवी हक्क आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे.

✻ नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल.

## जाहिर सूचना

दिनांक : ०९/०८/२०२६

नमस्कार,

दै चालु वार्ता कडून जाहीर करण्यात येथे की जर आमचा म्हणजेचं दै चालु वार्ताचा प्रतिनिधी आहे म्हणून कोणी दावा करत असेल तर त्याचं ID कार्ड पाहू शकता किंवा नियुक्ती लेटर सध्या जे आमचे पत्रकार आहेत त्याच्याकडे चालू कालावधीचे ID कार्ड किंवा नियुक्ती लेटर असतं तेंच आमचे पत्रकार आहेत. (कालावधी संपलेले ID किंवा नियुक्ती लेटर असेल आणि ते दै चालु वार्ताचा प्रतिनिधी असल्याचा दावा करत असतील तर ते खोटं आहे. तर आपण आमच्या कार्यालयात खालील नं वर संपर्क करू शकता.) जर कालावधीच्या आतील त्यांच्याकडे ID किंवा नियुक्ती लेटर नसेल तर ते सध्या आमचे म्हणजे दै चालु वार्ताचे अधिकृत पत्रकार नाहीत. जरी त्यांच्या पेपरला बातम्या लागत असतील तरीही ते अधीकृत नाहीत (बातम्या पत्रकारच्या नावानी त्यांनी केलेल्या विनंती मुळे लावल्या जातात.)

**टीप :** दै चालु वार्ताच नियुक्ती लेटर किंवा ID ओरिजिनल आहे कसं कळणार. ओरिजिनल ID व नियुक्तीलेटर वर युन्कि रेफरन्स नं आहे जों Ref पासून सुरु होतो.

कार्यालय : जय चेम्बर, दुसरा मजला ऑफिस नं २०७, २०८ शिवाजी रोड स्वारगेट चौक पुणे, मो ९३७३५०४७४८

(पान १ वरून ...☞)

### अभिजीतच्या नियतीमध्ये खोट ...

आंदोलन करणाऱ्या तरुणांना न्याय दिल्याशिवाय राहणार नाही. देशासोबत पुन्हा अरविंद केजरीवालसारखा धोका आम्ही होऊ देणार नाही. आम्ही व्यासपीठावर नेत्यांसारखं भाषण करूतरुण मार खातील अशी यांची हुकूमशाही सुरूआहे. मी त्यांचा सारखा खोटारडा नाही. मरेल पण इथून उठणार नाही.

# उपवर्गीकरण ही भाजपची चाल असल्याने दुश्मन मातंग कसा काय ? - मनिषभाऊ कावळे

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नांदेड - प्रतिनिधी
शेख शादुल्ला शेख युनुस



**नांदेड :** जिल्यातील हदगाव तालुक्यातील अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करणे ही भारतीय जनता पक्षाची चाल असल्याने आमचा दुश्मन मातंग समाज कसा काय ? असा गंभीर प्रश्न बहुजन समाज पक्षाचे मराठवाडा झोन प्रभारी मनिषभाऊ कावळे यांनी उपस्थित केला.

आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात हदगाव (जिल्हा नांदेड) येथे आयोजित करण्यात आलेल्या महामोर्चाच्या समारोप प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून मनिषभाऊ कावळे बोलत होते. भिक्खू पय्याबोधी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या भाषणात मनिषभाऊ कावळे पुढे म्हणाले की, आरक्षणाचे उपवर्गीकरण करतो म्हणून अनुसूचित जातीतील प्रमुख घटक असलेल्या मातंग समाजाला आपल्याकडे वळविण्यासाठी संघ व भाजप परिवाराने ही चाल खेळली असून त्याला विरोध करण्यासाठी म्हणून निघणाऱ्या मोर्चात भाजप व सरकारला शत्रू न ठरविता जाणूनबुजून मातंग समाजाला टार्गेट केले जात आहे. या मनुवादी चालीमुळे समाजाचे विघटन होऊन भाजप यशस्वी होणार आहे, हे आपण वेळीच ओळखले पाहिजे.

उपवर्गीकरण लढाई लढत असतांना आपला शत्रू क्रमांक एक कोण आहे ते अगोदर निश्चित करणे आवश्यक आहे. सध्याचे मनुवादी सरकार आणि जातीयवादी नरेंद्र आणि देवेंद्र यांचा दारुण पराभव करुन आपली बहुजन समाजाची सत्ता प्रस्थापित करणे हे आपले ध्येय आणि उद्दिष्ट असले पाहिजे. यासाठी अगोदर घरभेद्यांच्या विरोधात लढावे लागणार असल्याचेही मनिषभाऊ कावळे यांनी शेवटी ठासून सांगितले.

यावेळी बहुजन समाज पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर, जिल्हा महासचिव सुधाकर सरोदे, जिल्हा कोषाध्यक्ष सखाराम इंगोले, हदगाव विधानसभा प्रभारी आर. व्ही. वाठोरे, प्रा. विजयकुमार भरणे, विधानसभा अध्यक्ष साहेबराव नरवाडे इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती. भीम टायगर सेनेचे दादासाहेब शेळके व सहकाऱ्यांनी यांनी या मोर्चाचे आयोजन केले होते.

# डॉ.बनसोडेंच्या तत्परतेने बसमधील गर्भवतीची सुखरूप प्रसूती

## कुरकुंभ PHC तील आरोग्य टीमच्या प्रसंगावधानाचे परिसरातून कौतुक

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
कुरकुंभ - प्रतिनिधी



**कुरकुंभ :** पुण्याहून कर्नाटककडे खासगी ट्रॅव्हल्सने पतीसह प्रवास करणाऱ्या गर्भवती महिलेवर कुरकुंभ परिसरात अचानक प्रसूती कळा सुरू झाल्याने आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली. यावेळी बसचालकाने प्रसंगावधान राखत बस तातडीने कुरकुंभ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणल्याने वैद्यकीय अधिकारी डॉ.तुकाराम बनसोडे यांच्या तत्परतेमुळे माता व बालकाची सुखरूप प्रसूती होऊन मोठा अनर्थ टळला.

दि.६ ऑगस्ट रोजी रात्री श्रीमती मोनिका सतीश दुर्गाळे या आपल्या पतीसह पुण्याहून कर्नाटक येथील आपल्या गावी प्रसूतीसाठी खासगी ट्रॅव्हल्सने जात होत्या. बस कुरकुंभ परिसरात आल्यानंतर त्यांना अचानक नैसर्गिक प्रसूतीच्या कळा सुरूझाल्या. त्यामुळे दुर्गाळे दाम्पत्यासमोर मोठे संकट उभे राहिले.

या वेळी बसचालकाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पहाटे सुमारे १ वाजण्याच्या सुमारास बस जवळच असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र, कुरकुंभ येथे आणली. केंद्रात उपस्थित असलेले वैद्यकीय अधिकारी डॉ.तुकाराम बनसोडे, आरोग्य सेविका तेजल सोनवणे व अरुणा राहिंज यांनी तातडीने परिस्थिती हाताळत महिलेची प्रसूती सुखरूप होण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यांच्या तत्पर उपचारामुळे महिलेची सुखरूप प्रसूती झाली आणि माता व नवजात बालक दोघेही सुरक्षित राहिले. प्रसूतीनंतर माता व बालकास प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करून आवश्यक वैद्यकीय देखरेख ठेवण्यात आली. त्यानंतर इतर प्रवाशांना घेऊन संबंधित बस कर्नाटकच्या दिशेने रवाना झाली. यावेळी डॉ. तुकाराम बनसोडे यांनी सांगितले की, 'अर्धा तास जरी उशीर झाला असता, तर सदर महिलेची प्रसूती दुर्दैवाने बसमध्येच झाली असती. त्यामुळे माता व बालकाच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता अधिक होती.'

मोनिका दुर्गाळे यांचे पती सतीश दुर्गाळे यांनी कुरकुंभ आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत तत्परतेने सेवा दिल्याबद्दल संपूर्ण आरोग्य टीमचे आभार मानले. तसेच पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील तत्पर आरोग्य सेवेबद्दल समाधान व्यक्त केले. या घटनेनंतर डॉ.तुकाराम बनसोडे तसेच कुरकुंभ प्राथमिक आरोग्य केंद्रातील संपूर्ण आरोग्य टीमचे परिसरातून कौतुक होत आहे. आपत्कालीन परिस्थितीत कोणताही विलंब न करता प्रसंगावधान राखून माता व बालकाला सुरक्षितपणे वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिल्याबद्दल नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

### संकटसमयी आरोग्य टीम ठरली आधार

डॉ.तुकाराम बनसोडे यांची तत्पर सेवा कौतुकास्पद

कुरकुंभ प्राथमिक आरोग्य केंद्रात पहाटेच्या वेळी दाखल झालेल्या गर्भवती महिलेची परिस्थिती ओळखून वैद्यकीय अधिकारी डॉ. तुकाराम बनसोडे यांनी तातडीने उपचार सुरू केले. आरोग्य सेविका तेजल सोनवणे व अरुणा राहिंज यांनीही प्रसूतीसाठी आवश्यक सहकार्य केले. सर्वांच्या तत्पर प्रयत्नांमुळे माता व बालकाची प्रसूती सुखरूप पार पडली. या सेवाभावी व प्रसंगावधानाच्या भूमिकेबद्दल कुरकुंभ परिसरातून आरोग्य टीमचे कौतुक होत आहे.

# ऑल सिख-सिकलीगर असोसिएशन (आसा)ची महाराष्ट्र स्तरीय बैठक बडनेरा येथे उत्साहात संपन्न

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
संग्रामपूर - प्रतिनिधी
नंदकिशोर शिरसोले




### नानकसिंगजी बावरी यांची विदर्भ अध्यक्षपदी, तर अनिलसिंग चव्हाण यांची विदर्भ उपाध्यक्षपदी नियुक्ती

**संग्रामपूर :** ऑल सिख-सिकलीगर असोसिएशन (आसा) च्या वतीने महाराष्ट्र स्तरीय महत्त्वपूर्ण बैठक बडनेरा येथे उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाली. या बैठकीत संघटनेच्या आगामी वाटचालीसह समाजाच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. समाजाच्या हितासाठी संघटितपणे कार्य करण्यासोबतच सामाजिक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. बैठकीदरम्यान संघटनेच्या महाराष्ट्रातील विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही जाहीर करण्यात आल्या. तळेगाव, तालुका आष्टी, जिल्हा वर्धा येथील दास अर्थात नानकसिंगजी बावरी यांची विदर्भ अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. तसेच संग्रामपूर, जिल्हा बुलढाणा येथील सूर्या मराठी न्यूजचे संपादक अनिलसिंग चव्हाण यांची विदर्भ उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

या नियुक्त्यांमुळे विदर्भातील संघटनेच्या कार्याला अधिक बळ मिळणार असून, संघटनात्मक कार्याला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवर, संघटनेचे पदाधिकारी तसेच समाजबांधवांकडून अभिनंदन करण्यात आले.

नानकसिंगजी बावरी यांच्यावर विदर्भ अध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. समाजहितासाठी सातत्याने कार्य करण्याच्या त्यांच्या भूमिकेची दखल घेत ही जबाबदारी देण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

त्याचप्रमाणे पत्रकारिता आणि सामाजिक विषयांवर सातत्याने आवाज उठविणारे सूर्या मराठी न्यूजचे संपादक अनिलसिंग चव्हाण यांची विदर्भ उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याने समाजबांधव आणि त्यांच्या समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना पुढील सामाजिक आणि संघटनात्मक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. वाहेगुरू जींच्या असीम कृपेने संघटनेचे कार्य अधिक मजबूत व्हावे, समाजातील सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून प्रभावीपणे कार्य व्हावे आणि समाजसेवेचे कार्य अधिक व्यापक व्हावे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनीही संघटनेने सोपविलेली जबाबदारी प्रामाणिकपणे आणि निष्ठेने पार पाडण्याचा संकल्प व्यक्त केला. समाजातील एकजूट, सामाजिक बांधिलकी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्य करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

बडनेरा येथे पार पडलेल्या या महाराष्ट्र स्तरीय बैठकीमुळे ऑल सिख-सिकलीगर असोसिएशन (आसा)च्या विदर्भातील संघटनात्मक विस्ताराला नवी ऊर्जा मिळणार असल्याचे दिसून येत आहे. आगामी काळात समाजाच्या विविध प्रश्नांवर काम करण्यासोबतच सामाजिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने संघटनेची वाटचाल अधिक गतिमान होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पूर्णानगर येथील उर्दू शाळेला शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

## इयत्ता ७ वीचा १००% निकाल; इयत्ता ४ थीतही उल्लेखनीय कामगिरी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
अमरावती - प्रतिनिधी
संजय सरवटकर




**अमरावती :** पूर्णा नगर, ता. भातकुली जिल्हा परिषद उर्दू पूर्व माध्यमिक शाळा, पूर्णा नगर, ता. भातकुली, जि. अमरावती या शाळेने महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करून तालुक्यात आपला ठसा उमटविला आहे. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्यामुळे शाळेला हे यश मिळाले आहे. इयत्ता ७ वी शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेतील ७ पैकी ७ विद्यार्थी पात्र ठरून शाळेने १०० टक्के निकालाची ऐतिहासिक कामगिरी केली. आयशा सदफ शेख नसीर, आयशा अब्दुल अनीस सौदागर, अदीना तहरीन जैनुल आबेदीन, अर्बिया महविश आसिफ खान सौदागर, मरिया साहेल सलीम खान, फरहान अजमल सादिक खान आणि आयेशा समर मोहम्मद नौशाद या विद्यार्थ्यांनी यश संपादन करून शाळेच्या नावलौकिकात भर घातली.


तसेच इयत्ता ४ थी शिष्यवृत्ती परीक्षेत ५ पैकी २ विद्यार्थी पात्र ठरले. अल्फिजा फातिमा मोहम्मद अकील आणि उम्मे अयमान छोटू शाह यांनी उल्लेखनीय यश मिळवून शाळेचा गौरव वाढविला. पात्र न ठरलेल्या विद्यार्थ्यांनीही चांगली कामगिरी केली असून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शिक्षकांनी प्रोत्साहन दिले आहे.

या यशामागे शाळेतील नियमित सराव परीक्षा, गुणवत्तापूर्ण अध्यापन, विद्यार्थ्यांवर वैयक्तिक लक्ष, अतिरिक्त मार्गदर्शन वर्ग आणि पालकांचे सहकार्य यांचा मोठा वाटा असल्याचे शिक्षकांनी सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही योग्य मार्गदर्शन मिळाल्यास उत्कृष्ट यश मिळवू शकते, हे या निकालातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

या यशाबद्दल मुख्याध्यापिका रेहाना बानो यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले. मार्गदर्शक शिक्षक नवेद इक्बाल मोहम्मद साबीर यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करत आगामी स्पर्धा परीक्षा व शिष्यवृत्ती परीक्षांसाठी अधिक जोमाने तयारी करण्याचे आवाहन केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अब्दुल अलीम अब्दुल तमीज यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शाळेच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. गावातील नागरिक, पालक आणि शिक्षणप्रेमींनी शाळेच्या या यशाचे स्वागत करत शिक्षक व विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. ग्रामीण भागातील उर्दू माध्यमाच्या शाळेने मिळविलेल्या या उल्लेखनीय यशामुळे पूर्णा नगर परिसरात आनंदाचे वातावरण असून, शाळेच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

# पालकमंत्री संजय राठोड यांनी घेतली दखल मुख्याधिकाऱ्यांना चौकशीचे निर्देश

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
दिग्रस - प्रतिनिधी
गजानन गंडाळे


REG NO -U85300MH2022NPL383632

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ
जिल्हाध्यक्ष-यवतमाळ
मो.शहबाज मो.अकिल

सुविचार -

दिनांक :- १४/०६/२०२६

Date 06/08/2026

प्रति,
मा. श्री. संजयभाऊ राठोड साहेब,
मृद व जलसंधारण मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, यवतमाळ जिल्हा.

विषय : दिग्रस शहरातील सुरू असलेल्या विकासकामांची चौकशी करून निकृष्ट कामांवर कारवाई करणे तसेच नगर परिषद दिग्रसच्या कामकाजाची चौकशी करण्याबाबत.

महोदय,

आपला नम्र
श्री.मो.शहबाज मो.अकील
जिल्हा अध्यक्ष-यवतमाळ
माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ

Office Adress-Diwan Nagar Digras Dist.Yavatmal Mob.8983588143

दिग्रसमधील विकासकामांच्या गुणवत्तेच्या तक्रारीवर मो.शहबाज मो. अकील यांचे निवेदन

**दिग्रस :** दिग्रस शहरातील विविध विकासकामांची उच्चस्तरीय चौकशी करून निकृष्ट दर्जाच्या कामांवर कठोर कारवाई करावी तसेच नगर परिषद दिग्रसच्या कामकाजाची स्वतंत्र चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे जिल्हाध्यक्ष मो.शहबाज मो. अकील यांनी महाराष्ट्राचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्याकडे निवेदन सादर केले होते.

या निवेदनाची दखल घेत पालकमंत्री संजय राठोड यांनी निवेदनावर 'मुख्याधिकारी, नगर परिषद दिग्रस - तपासावे' असा शेरा (इंडोर्समेंट) करून संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. निवेदनात शहरातील नाले, रस्ते व इतर विकासकामांच्या गुणवत्तेबाबत नागरिकांमध्ये संशय निर्माण झाल्याचा उल्लेख करण्यात आला असून, वरिष्ठ स्तरावर तांत्रिक तपासणी करून प्रत्यक्ष पाहणी करण्यात यावी, निकृष्ट दर्जाची कामे आढळल्यास संबंधित कंत्राटदार, अभियंते व जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच नगर परिषद दिग्रसच्या प्रशासकीय कामकाजाची, प्रलंबित नागरिकांच्या तक्रारींची व विकासकामांमधील अनियमिततेची स्वतंत्र चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. पालकमंत्र्यांनी निवेदनाची दखल घेत मुख्याधिकाऱ्यांना चौकशीचे निर्देश दिल्यामुळे या प्रकरणात पुढे कोणती कार्यवाही होते, याकडे दिग्रस शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# आष्टी उपसा सिंचन योजनेच्या तिसऱ्या टप्प्यासाठी ११७ कोटींची निविदा प्रक्रिया सुरू

## मोहोळ तालुक्यातील सिंचन प्रकल्पाला गती; राजन पाटील यांच्या पाठपुराव्याला यश - लोकनेते बाबुराव अण्णांची स्वप्नपूर्ती

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मोहोळ - प्रतिनिधी

**मोहोळ :** मोहोळ मतदारसंघातील आष्टी उपसा सिंचन योजनेच्या तिसऱ्या टप्प्यासाठी ११७ कोटींच्या विविध कामांच्या निविदा प्रक्रियेला शासनाने प्रारंभ केला आहे. आष्टी उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक ३ (अनगर व १० गावे उपसा सिंचन योजना) च्या टेंडर आणि भूमीपूजन प्रक्रियेला गती मिळाल्यामुळे मोहोळ तालुक्यातील (जि. सोलापूर) अनगर आणि त्यासमोरील एकूण १० गावांना थेट मोठा फायदा होणार आहे. या योजनेसाठी आष्टी तलावातून पाणी उचलले जाणार असून यामुळे या दुष्काळी भागातील शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल.या प्रक्रियेमुळे मोहोळ तालुक्याच्या उत्तर भागातील महत्त्वाच्या उपसा सिंचन प्रकल्पाच्या कामाला गती मिळणार असून, माजी आमदार राजन पाटील यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. या योजनेमुळे मोहोळ तालुक्याच्या उत्तर भागातील सिंचनक्षेत्र वाढण्यास मदत होणार आहे. राजन पाटील यांनी या योजनेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी वेळोवेळी मुख्यमंत्री व जलसंपदा मंत्र्यांकडे केली होती. शासनाने त्याची दखल घेत निविदा प्रक्रियेला मंजुरी दिल्याने योजनेच्या पूर्णत्वाला गती मिळणार आहे. प्रामुख्याने ही कामे उजनी कालवा विभाग क्रमांक ९, मंगळवेढा कार्यालयाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदेमध्ये पंपगृह, उर्ध्वगामी नलिका, वितरण कुंड यांची स्थापत्य, यांत्रिकी व विद्युत कामे, बंदिस्त नलिका वितरण प्रणाली उभारणे, पाणी वापर संस्था स्थापन करून सिंचन क्षेत्र हस्तांतरित करणे, पाच वर्षांची देखभाल-दुरुस्ती तसेच आष्टी उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक १ मधील डावा व उजवा कालवा अस्तरीकरणाची कामे करण्यात येणार आहेत.

> - आष्टी उपसा सिंचन योजनेच्या यापूर्वीच्या टप्प्यांच्या पूर्णत्वासाठी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा दिवंगत नेते अजितदादा आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी वेळोवेळी सहकार्याची भूमिका घेतली. तिसऱ्या टप्प्याच्या निविदा प्रक्रियेलाही त्यांनी सहकार्य केले. यापुढेही मोहोळ मतदारसंघातील उपेक्षित भागाला हक्काचे पाणी मिळावे आणि सीना-भोगावती जोड प्रकल्पाला मंजुरी मिळावी यासाठी माझा पाठपुरावा सुरू राहील.
>
> -राजन पाटील, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार परिषद



# प्रभात एज्युकेशन सोसायटी द्वारा मजहर अली यांचा सन्मान

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
अमरावती - प्रतिनिधी
संजय सरवटकर



**अमरावती :** येथील प्रतिष्ठित शिक्षक म्हणून सर्वांना परिचित असलेले मजहर अली गजनफर अली यांची सहाय्यक शिक्षक पदावरून अंजनगाव कसबा येथे हाजी शकूर उर्दू हायस्कुल वर मुख्याध्यापक पदावर नियुक्ती झाल्याबद्दल प्रभात एज्युकेशन सोसायटी अमरावती द्वारा त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सोसायटी चे संस्थापक अध्यक्ष वि.दा. पवार, उपाध्यक्ष नरेंद्र पाटणे, सचिव सौ.कविता पवार, गजानन माहुलकर, अशोक पांडे, ॲड. जी. एस. तांबटकर, सुरेंद्र धामणकर, विजय हरणे पाटील संजय वाघुळे, श्रीकृष्ण नाईक तसेच स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ, अमरावती चे पदाधिकारी यांनी मजहर अली यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मजहर अली हे अनेक वर्षापासून शिक्षकी पेशेशी जुळले असून त्यांनी अनेक चांगले विध्यार्थी घडविले आहेत. तसेच त्यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक मधे उर्दू माध्यमातून दुरस्थ पद्धतीने मुस्लिम समाजातील विध्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी विशेष प्रयत्न केले.

## चुटकुले

शिक्षक: उशीर का झाला शाळेत यायला?
चिंटू: आई बाबा भांडत होते,
शिक्षक: त्याचा उशिरा येण्याशी काय संबंध?
चिंटू: माझा एक बूट आईच्या हातात व दुसरा बाबांच्या हातात होता.

---

एक मुलगी घरातून पळून जाऊन लग्न करते.
आणि ३ दिवसांनी परत घरी येते,
वडील(रागाने): आता काय हवंय?
मुलगी: बारीक पिनचा चार्जर !

## * सुविचार *

आनंद विकत मिळत नाही, तो स्वतःच्या वागण्यातून निर्माण करावा लागतो.

# सत्यमेव जयते फार्मर कप २०२६ मधील शेतकरी गटांना डॉ.अविनाश पोळ सर यांचे मार्गदर्शन

## स्वतः प्रवासखर्च करत व जेवणाचे डब्बे सोबत घेत शेतकरी गटांनी स्नेहभोजनातून जपली एकजूट!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वैजापूर - प्रतिनिधी
अनिल सूर्यवंशी



**वैजापूर :** सत्यमेव जयते फार्मर कप २०२६ च्या अनुषंगाने गंगापूर, खुलताबाद व वैजापूर तालुक्यातील शेतकरी गटांसाठी वैजापूर पंचायत समिती सभागृहात विशेष मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास पाणी फाउंडेशनचे प्रमुख मार्गदर्शक डॉ.अविनाश पोळ सर यांच्या प्रमुख उपस्थितीत ४८ शेतकरी गटांचे निमंत्रक व तब्बल २८७ शेतकरी सदस्य उपस्थित होते.

**विशेष बाब म्हणजे...**

विविध भागांतून आलेल्या शेतकरी गटांनी स्वतःच्या प्रवासाचा खर्च केला तसेच स्वतःचे जेवणाचे डबे सोबत आणले. कार्यक्रमानंतर सर्वांनी एकत्र बसून स्नेहभोजनाचा आनंद घेतला.

**प्रमुख उपस्थिती**

डॉ.अविनाश पोळ (प्रमुख मार्गदर्शक पाणी फाउंडेशन)

आनंद गंजेवार सर (उपविभागीय कृषी अधिकारी, वैजापूर)

व्यंकट ठक्के सर (तालुका कृषी अधिकारी, वैजापूर)

प्रल्हाद अरसूळ सर (विभागीय समन्वयक, पाणी फाउंडेशन)

कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात पानी फौंडेशनचे विभागीय समन्वयक प्रल्हाद अरसूळ सर यांनी कार्यक्रम प्रास्ताविक देत मान्यवरांचे स्वागत केले आणि तालुका फील्ड ऑफिसर यांनी स्मार्ट शेती ॲपमधील विविध नोंदी, SOP व आवश्यक माहिती योग्य पद्धतीने भरण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

ॲप वापरताना गटांना येणाऱ्या अडचणी व प्रश्नांचे निराकरणही करण्यात आले.

**दुसरा टप्पा - संघर्षातून यशाकडे...**

विविध शेतकरी गटांनी गटबांधणीपासून आजपर्यंतचा संघर्षमय प्रवास, आलेल्या अडचणी आणि एकमेकांना केलेली मदत यांचे अनुभव उपस्थितांसमोर मांडले. राज्यस्तरीय बक्षीस प्राप्त 'उंच भरारी महिला शेतकरी गट, सोबलगाव' यांनीही आपल्या खडतर आणि यशस्वी प्रवासातून उपस्थित शेतकरी गटांना प्रेरणा दिली.

**डॉ.अविनाश पोळ सर यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन**

मुख्य मार्गदर्शनात डॉ.अविनाश पोळ सर यांनी शेतकरी गटांशी थेट संवाद साधत गटशेतीचा खरा उद्देश स्पष्ट केला. 'बक्षीस मिळवणे हा गटाचा अंतिम उद्देश नसून, एकमेकांना साथ देणारी आणि आत्मीयता जपणारी माणसे निर्माण करणे हा गटशेतीचा खरा उद्देश आहे.'

विषमुक्त शेती, ज्ञानाधिष्ठित शेती, शेतीशाळा तसेच शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले.

दुष्काळातून मार्ग काढून शेती व दुग्ध व्यवसायातून रोजगारनिर्मिती करणाऱ्या गावांची उदाहरणे त्यांनी व्हिडिओ व छायाचित्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांसमोर मांडली. कार्यक्रमात उपस्थित कृषी व उमेद विभागाचे मेंटर राजेंद्र पंडोरे सर, आदिनाथ सपाटे सर, दीपक शेळके सर आणि कृष्णा केंद्रे सर हे देखील उपस्तिथ राहत संपूर्ण कार्यक्रमात नियोजन करण्यासाठी महत्त्वाचे कामगिरी केली. कार्यक्रमा मध्ये उपस्थित शेतकरी गट, प्रमुख पाहुणे व कृषी व उमेद विभागाचे मेंटर याचे आभार प्रदर्शन फाऊंडेशनच्या फील्ड ऑफिसर नित्तल सोळुंके यांनी केले तर कार्यक्रमाची रूपरेषा अविनाश काळे यांनी मांडली . स्नेहभोजनातून एकजुटीचा संदेश !

कार्यक्रमानंतर सर्व शेतकरी गटांनी स्वतःसोबत आणलेल्या जेवणाच्या डब्यांतून एकत्रित स्नेहभोजनाचा आनंद घेतला. स्वखर्चाने प्रवास करून, स्वतःचे डबे सोबत घेऊन आणि कोणत्याही अतिरिक्त खर्चाची अपेक्षा न ठेवता उपस्थित राहिलेल्या २८७ शेतकरी सदस्यांनी दाखवलेली आपुलकी, स्वयंप्रेरणा आणि एकजूट हीच सत्यमेव जयते फार्मर कप २०२६ च्या गटशेती चळवळीची खरी ताकद आहे. सर्व गटाच्या सदस्यांनी आणलेली भाजी भाकरी कृषी विभाग व पाणी टीम यांनी खाऊन त्यांचा आनंद व्दिगुणित केला.

# शिरपूर ग्रामपंचायतीकडून अतिक्रमणधारकांना अभय?

## दोन महिन्यांपासून तक्रार प्रलंबित; पंचायत समितीच्या आदेशालाही केराची टोपली, १५ ऑगस्टला आंदोलनाचा इशारा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वाशिम - प्रतिनिधी
प्रताप नागरे




**वाशिम :** शिरपूर ग्रामपंचायत हद्दीतील सार्वजनिक नाली बुजवून करण्यात आल्याचा आरोप असलेल्या अतिक्रमणप्रकरणी गेल्या दोन महिन्यांपासून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने ग्रामपंचायत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तक्रारदाराने ग्रामपंचायत प्रशासन अतिक्रमणधारकांना पाठीशी घालत असल्याचा गंभीर आरोप करत, येत्या पाच दिवसांत नियमानुसार कारवाई न झाल्यास १५ ऑगस्ट रोजी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित अतिक्रमणाबाबत तक्रारदाराने १ जून २०२६ रोजी शिरपूर ग्रामपंचायतीकडे लेखी तक्रार दाखल केली होती. सार्वजनिक नाली बुजवून अतिक्रमण करण्यात आल्याचा आरोप या तक्रारीत करण्यात आला होता. मात्र, दीर्घकाळ कोणतीही कारवाई न झाल्याने तक्रारदाराने १५ जून २०२६ रोजी पंचायत समितीकडे धाव घेत पुन्हा लेखी तक्रार सादर केली.

या तक्रारीची गंभीर दखल घेत पंचायत समितीने १७ जून २०२६ रोजी ग्रामपंचायतीला संबंधित अतिक्रमणावर तातडीने कारवाई करून त्याचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. मात्र, पंचायत समितीच्या आदेशानंतरही आजपर्यंत प्रत्यक्ष कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पंचायत समितीच्या आदेशालाही ग्रामपंचायतीने केराची टोपली दाखवली का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, ग्रामसेवक शिवाजी काकडे यांच्याकडे अनेकदा पाठपुरावा करूनही केवळ आश्वासने आणि उडवाउडवीची उत्तरे मिळत आहेत. परिणामी प्रशासन नेमके कोणाच्या दबावाखाली काम करत आहे? अतिक्रमणधारकांना संरक्षण देण्यामागे कोणाचा स्वार्थ दडलेला आहे का? असे प्रश्न आता ग्रामस्थांमध्ये चर्चिले जाऊ लागले आहेत.

दरम्यान, सार्वजनिक जागा आणि नाल्यांवरील अतिक्रमणामुळे भविष्यात पावसाळ्यात पाणी तुंबणे, स्वच्छतेच्या समस्या निर्माण होणे आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या प्रकरणात प्रशासनाने विलंब न करता पारदर्शक आणि नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

येत्या पाच दिवसांत संबंधित अतिक्रमण हटविण्याची प्रभावी कारवाई न झाल्यास १५ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा तक्रारदाराने दिला आहे. आता ग्रामपंचायत प्रशासन या प्रकरणात नेमकी कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

## राशि भविष्य

**मेष :** हृदयरोग असणाऱ्यांनी कॉफी सोडण्याची तातडीची गरज आहे. यापुढेही असेच कॉफी घेत राहिलात तर आपल्या हृदयावर अनावश्यक दडपण येईल.

**वृषभ :** आरोग्याच्या तक्रारीमुळे एका महत्त्वाच्या असाईनमेंटवर तुम्हाला जाता न आल्यामुळे तुम्हाला माघार घ्यावी लागेल, पण तुमचे तर्कशास्त्र वापरून पुढे जात राहा.

**मिथुन :** आजचा दिवस लाभदायक असून, तुम्हाला तुमच्या दीर्घ आजारापासून सुटका मिळण्याची शक्यता आहे. पुरातन वस्तू आणि दागदागिन्यांमधील गुंतवणूक फायदा आणि समृद्धी आणेल.

**कर्क :** मित्रांचा आधार लाभेल आणि ते तुम्हाला आनंदी ठेवतील. अधिकचा पैसा स्थावर जंगम मालमत्तेत गुंतवा. काही लोक तुमच्यासाठी गंभीर परिस्थिती निर्माण करतील परंतु तुम्ही त्यांच्याकडे निव्वळ दुर्लक्ष करा.

**सिंह :** घरात काम करताना विशेष काळजी घ्यावी लागेल. घरगुती वस्तुंची बेफिकीरपणे हाताळणी करणे तुम्हाला अडचणीत टाकू शकते.

**कन्या :** तुमचा आजार तुमच्या दु:खाचे कारण ठरेल. लवकरात लवकर त्यावर मात करून कुटुंबात आनंद परत आणा. आजच्या दिवशी गुंतवणूक करणे टाळा.

**तुळ :** अतिशय प्रभावी व्यक्तींच्या पाठिंब्यामुळे तुमचे मनोधैर्य उंचावेल. आजच्या दिवशी घरातील इलेक्ट्रोनिक वस्तू खराब होण्याच्या कारणाने धन खर्च होऊ शकते.

**वृश्चिक :** आज तुमची प्रकृती चांगली राहील. त्यामुळे तुम्हाला यश मिळेल. परंतु, तुमचे सामर्थ्य संपुष्टात येईल असे काही करण्याचे कटाक्षाने टाळा. नवीन करार लाभदायक वाटण्याची शक्यता आहे, पण तुमच्या अपेक्षेप्रमाणे लाभ होण्याची शक्यता कमी आहे.

**धनु :** तुमचे कुटुंब तुमच्याकडून जरूरीपेक्षा खूप अधिक अपेक्षा ठेवेल. त्यामुळे तुम्ही वैतागून जाल. तुमच्या माता पक्षाने आज तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे.

**मकर :** आज तुम्ही करमणुकीत रमाल. क्रीडा प्रकार आणि मैदानावरील स्पर्धेमध्ये सहभागी व्हाल. बिन बुलाया मेहमान आज घरी येऊ शकतो परंतु, या पाहुण्याच्या आगमनाने तुम्हाला आर्थिक लाभ होऊ शकतो.

**कुंभ :** जर तुमची धन संबंधित काही गोष्ट कोर्ट-कचेरीत आटलेली असेल तर आज त्यात तुम्हाला विजय मिळू शकतो आणि तुम्हाला धन लाभ ही होऊ शकतो.

**मीन :** यश हातातोंडाशी येण्याची शक्यता वाटताना आपली ताकद कमी होत जाण्याची भावना निर्माण होईल. ज्या लोकांनी अतीत मध्ये आपली धन गुंतवणूक केली होती आज त्या धनाने लाभ होण्याची शक्यता आहे.

# दैनिक चालु वार्ताच्या बातमीची आणखी एक दखल !

## नायगाव टोल नाक्यावर रुग्णवाहिका दाखल; प्रथमोपचारासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मंठा - प्रतिनिधी
सुरेश ज्ञा. दवणे



**जालना (मंठा) :** टोल वसुली जोरात... पण सुविधा कुठे? या मथळ्याखाली दैनिक चालु वार्तांने शेगाव पंढरपूर दिंडी मार्गांवर मंठा तालुक्यातील नायगाव टोल नाक्यावरील नागरिकांच्या गैरसोयी आणि अपघातग्रस्तांना तातडीची वैद्यकीय मदत मिळत नसल्याबाबत सातत्याने वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्तमालिकेची दखल घेत आता नायगाव टोल नाक्यावर रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली असून, प्रथमोपचारासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नायगावजवळ अपघात झाल्यास जखमींना तातडीने मदत मिळावी, यासाठी रुग्णवाहिका टोल नाक्यावर तैनात करण्यात आली आहे. तसेच अपघाताच्या वेळी जखमींना प्राथमिक उपचार मिळावेत यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याने वाहनधारक आणि स्थानिक नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. यापूर्वी अपघातग्रस्तांना तातडीची रुग्णवाहिका व प्रथमोपचार सुविधा उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या. त्यानंतर रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला कासव गतीने का होईना सुरुवात झाली आणि आता रुग्णवाहिका व प्रथमोपचाराची सुविधा उपलब्ध झाल्याने नागरिकांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. मात्र, नागरिकांचे म्हणणे आहे की, रुग्णवाहिका आणि प्रथमोपचार सुविधा सुरू झाल्या, ही स्वागतार्ह बाब असली तरी इतर मूलभूत सुविधांकडेही



दैनिक
चालु वार्ता
Powered by epaper.chaluwartha.com
28 Jul 2026 - Page 3

**बातमीचा परिणाम! नायगाव टोल रस्त्याच्या दुरुस्तीला सुरुवात**

**मात्र अन्य सुविधा अद्यापही रखडल्या**

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मंठा - प्रतिनिधी

**मंठा :** शेगाव -पंढरपूर दिंडी महामार्ग नायगाव टोल नाक्यावरील सुविधा आणि खराब रस्त्यामुळे नागरिकांच्या गैरसोयीबाबत दैनिक चालु वार्तामध्ये दि २१जुलै रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तानंतर प्रशासनाने रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात केली आहे. मात्र, केवळ रस्त्याची दुरुस्ती करून प्रश्न सुटणार नसून इतर मूलभूत सुविधांकडेही तातडीने लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू झाल्याने समाधान व्यक्त केले जात असले, तरी अपघातग्रस्तांसाठी २४ तास रुग्णवाहिका सेवा, प्रथमोपचार सुविधा, प्रवासी निवारे, स्वच्छ पिण्याचे पाणी आणि प्रकाश व्यवस्था यांसारख्या सुविधा अद्यापही अपुऱ्या आहेत.

देवगाव फाट्याजवळ उभारण्यात आलेल्या प्रवासी विसावा व वाहन पार्किंग परिसरातील शौचालय अनेक दिवसांपासून बंद असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. तसेच तेथे पाण्याची आणि रात्रीच्या वेळी प्रकाशाची सुविधा नसल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.

नागरिकांनी टोल प्रशासनाला प्रश्न उपस्थित केला आहे की, रस्त्याची दुरुस्ती सुरू झाली, हे स्वागतार्ह आहे; मात्र टोल करारातील इतर सुविधा कधी सुरू होणार? अपघाताच्या वेळी तातडीने उपलब्ध होणारी रुग्णवाहिका, प्रवासी निवारे, स्वच्छ शौचालये, पिण्याचे पाणी आणि प्रकाश व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधा तात्काळ कार्यान्वित कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे. दरम्यान, संबंधित प्रशासनाने टोल करारातील सर्व अटींची प्रत्यक्ष पडताळणी करून नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात. तसेच सुविधा देण्यात हलगर्जीपणा आढळल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी वाहनधारक आणि स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

'रस्ता दुरुस्त होत आहे, हे चांगलेच... पण रुग्णवाहिका, प्रवासी निवारे, शौचालये आणि प्रकाश व्यवस्था कधी मिळणार?' असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

चालु वार्ता
टोल वसुली जोरात... पण सुविधा कुठे?


तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. दिंडी महा मार्गांवरील प्रवाशी निवारे उभरावे, रस्त्यावरील खड्डे नालायची जलद गतीने दुरुस्ती करण्यात यावी व देवगाव फाट्याजवळील प्रवासी विसावा व वाहन पार्किंग परिसरातील बंद शौचालय, पाण्याची कमतरता आणि रात्रीची प्रकाश व्यवस्था याबाबतही तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

प्रशासनाने उपलब्ध करून दिलेली रुग्णवाहिका व प्रथमोपचार सेवा नियमितपणे कार्यरत ठेवावी, आपत्कालीन परिस्थितीत ती तातडीने उपलब्ध व्हावी आणि नियुक्त कर्मचाऱ्यांची सेवा सातत्याने सुरूराहावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. दैनिक चालु वार्ताच्या वृत्ताची दखल घेत रस्ता दुरुस्तीपासून रुग्णवाहिका आणि प्रथमोपचार सुविधेपर्यंत झालेल्या या बदलामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## हे तुम्हांला माहिती आहे का ?

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

१) उंटाच्या डोळ्यांभोवती तीन पापण्या आणि दोन ओळीतील पापण्या असतात, वाळवंटातील वाऱ्यापासून संरक्षणासाठी.
२) गेंडा पक्ष्यांच्या मदतीने आपल्या अंगावरील कीटक काढतो, ते दोघे मित्रच समजा!
३) पोपट केवळ बोलायला शिकत नाही, तर तो आवाजांद्वारे भावना ओळखू शकतो.
४) समुद्री कासव जन्मानंतर पुन्हा त्या समुद्रकिनाऱ्यावर परत येतात जिथे त्यांचा जन्म झाला होता.
५) हिप्पोपोटॅमस (जलहत्ती) चा घाम गुलाबी रंगाचा असतो आणि तो नैसर्गिक सनस्क्रीनसारखं काम करतो.
६) पांडा १२ तासांपेक्षा जास्त वेळ फक्त बांबू खात असतो – आणि दिवसातून जवळपास ३० किलो बांबू खातो!
७) घोड्यांना जवळपास ३५० अंशांचं दृश्य दिसतं म्हणजे त्यांना जवळजवळ सगळं मागचंही दिसतं.
८) चित्ता हा एकमेव मांजर प्रजाती आहे जो गर्जना करू शकत नाही तो फक्त म्यांवसारखा आवाज करतो.
९) बेडूक पाणी आणि जमिनी दोन्हीवर श्वास घेऊ शकतो, कारण त्याच्या त्वचेवरूनही श्वसन होतं.
१०) स्लॉथ (आळशी प्राणी) इतका हळू चालतो की त्याच्या अंगावर शेवाळ उगवतं!
११) डुक्कर आकाशाकडे वर बघू शकत नाही त्यांच्या मानेला तसा कोन मिळत नाही.
१२) गिरगिटाचं प्रत्येक डोळं वेगवेगळ्या दिशेला पाहू शकतं, एकाच वेळी दोन दृश्यं!
१३) काही शार्क प्रजाती ५०० वर्षांपर्यंत जगतात म्हणजे ते मानवांच्या पिढ्यांपेक्षा जास्त जगतात!
१४) कुत्र्यांना ईर्ष्या वाटते, विशेषतः जर त्यांच्या मालकाने दुसऱ्या कुत्र्याला प्रेम दिलं तर.
१५) उंदीर आणि हत्ती दोघांनाही टिकली येते आणि ते हसतातही, फक्त आवाज मानवाला ऐकू येत नाही!



* टीप : वरील माहितीची दैनिक चालु वार्ता वृत्तपत्र कोणत्याही प्रकारे पुष्टी करत नाही

# चिखलीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मोहोळ - प्रतिनिधी

**मोहोळ :** मोहोळ तालुक्यातील चिखली येथील हनुमान मंदिरात अखंड हरिनाम ग्रंथराज ज्ञानेश्वर पारायण सोहळ्याचे भव्य आयोजन १४ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट या कालावधीत करण्यात आले असून, या धार्मिक सोहळ्याचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

ह.भ.प. तुकाराम महाराज ननवरे, ह.भ.प. कृष्णात महाराज पाटील, ह.भ.प. प्रकाश (काका) महाराज कुलकर्णी, (लोंढेवाडीकर) यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार दि. १४ रोजी सप्ताहास प्रारंभ होणार असून शुक्रवार दि.२१ रोजी सांगता होईल. सप्ताहादरम्यान दररोज पहाटे ४ ते ६ वाजेपर्यंत काकडा आरती, सकाळी ७ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ११ ते १ श्री तुकाराम गाथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, सायंकाळी ६ ते ७ ज्ञानेश्वरी प्रवचन, रात्री ९ ते ११ हरिजागर असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या सप्ताहात ह.भ.प. शरद महाराज शिंगाडे, (सारोळे), ह.भ.प. हनुमंत महाराज भोसले (पापरी ), ह.भ.प. सुधाकर महाराज भोरे (गावडे दारफळ), ह.भ.प. विजय महाराज गायकवाड ( देवडी), ह.भ.प. दादा महाराज जगताप (पाटकुल), ह.भ.प. नवनाथ महाराज दळवे (यावली), ह.भ.प. पांडुरंग महाराज देशमुख (काळेगाव) यांची किर्तने होणार आहेत. तसेच शुक्रवारी (दि.२१) सकाळी ९ ते १ वाजेपर्यंत भव्य पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाची सांगता ह.भ.प. हनुमंत महाराज मोरे ( साकत, ता. बार्शी) यांच्या काल्याच्या किर्तनाने होणार असून. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. काकडा आरती व हरिपाठ, किर्तन यासाठी श्री ज्ञानाई गुरूकुल अकलूज येथील विद्यार्थी वृंद याचा मोलाचा वाटा आहे. हा धार्मिक सोहळा यशस्वी करण्यासाठी गावातील सर्व ग्रामस्थ अतोनात परिश्रम घेत आहेत.

# कारंजात घंटागाड्यांची 'उलंगवाडी'! घरोघरी कचऱ्याचे ढीग

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
कारंजा लाड - प्रतिनिधी
अशोकराव उपाध्ये

**कारंजा :** कारंजा शहरात सर्वत्र तुडुंब भरून साचलेल्या नाल्या, घंटागाड्यांच्या तुटवड्यामुळे घरोघरी साचलेला कचऱ्याचा ढीग त्यामुळे ढासळलेली स्वच्छता व्यवस्था आणि या व्यवस्थेमुळे शहरात घंटागाड्यांची झालेली 'उलंगवाडी' याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे. नगरपरिषदेची सर्वात महत्त्वाची जबाबदारी असलेली स्वच्छता व्यवस्था पूर्णपणे ढासळल्याचे चित्र दिसत आहे. घराघरातून कचरा संकलित करून डम्पिंग ग्राऊंड पर्यन्त पोहचविण्याचे काम घंटा गाड्या करतात. प्राप्त माहितीनुसार कारंजा नगर पालिका अंतर्गत फक्त १४ घंटागाडी कार्यरत आहेत त्यामध्ये काही नेहमी नादुरुस्त असतात यामुळे फक्त १० घंटागाड्या कार्यरत आहेत. कारंजा नगर पालिका क्षेत्रात वाढीव हद्दीसह एकूण अंदाजे ३०



हजार घरे आहेत.पालिका नियमानुसार एकूण १२०० ते १५०० घरामागे १ घंटागाडी अपेक्षित असून त्या नुसार एकूण २० घंटागाडीची आवश्यकता असल्याचे बोलले जाते . सध्या १० ते १२ घंटा गाडी उपलब्ध आहेत.

अनेक भागांत घंटागाड्या नियमित येत नसल्याने नागरिकांना स्वतःच कचऱ्याची विल्हेवाट लावावी लागत आहे. कोणी चौकात कचरा टाकत आहे, तर काही सुजाण नागरिक मोटारसायकलवर पोती किंवा पिशव्यांमध्ये कचरा भरून शहराबाहेर नेऊन टाकत आहेत तर कुणी जवळच्या नालीतच कचरा ओतून देत आहे. परिणामी चौका चौकातील कचऱ्याच्या ढीगावरील घोंघावणाऱ्या माशा, त्यात चारा शोधणारी भटकी जनावरे ; दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त आहेत. असे विदारक चित्र शहरात पहावयास मिळत. शहराच्या विकासाची चाके इतर क्षेत्रांत वेगाने फिरत असताना, स्वच्छतेच्या मूलभूत व्यवस्थेचे चाक नेमके कुठे फसले याबाबत सुरस चर्चा ऐकायला मिळत आहेत. पालीका प्रशासनाने घंटा गाड्या नियमीत प्रत्येक वसाहतीत पाठवाव्या अशी मागणी जोर धरत आहे.

# कशी हतबल कहाणी (वेब सिरीज)


दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मुंबई - प्रतिनिधी
युवराज अडसुळे





**मुंबई :** टेक्नोलॉजी बोलण्यासाठी वगैरे ठीक आहे. खेड्यापाड्याच्या तुलनेत शहरी भागातील धावपळ, ऑफिस मधील ताण, ट्रेन मधून घरी परतताना गर्दीत झालेली भांडणं, त्यातून निर्माण होणारी चिडचिड, त्यामुळे दिवसभरातील स्वतः साठी वेळ अपुरा पडणे, या सगळ्या गोष्टींचा परिणाम आपल्या आरोग्यावर होत असतोतच परंतु मानसिक देखील होत असतो. परिणामी दिवसभरातील संपूर्ण वेळेचा आलेख आपण जर तपासला तर एक गोष्ट तुमच्या सहज लक्षात येईल कि, आपण आपल्या जोडीदाराला किती वेळ देतो, किंवा त्यांच्याशी किती संवाद साधतो. पूर्वी संवाद होतं नव्हते का? तर नक्कीच होतं होते त्या संवादा वाद जरी असतील तरी ते वाद वादातील संघर्ष शेवटच्या टोकापर्यंत जात नव्हते. ते प्रेम, आस्था, विश्वास, आपुलकी आणि नाते टिकून ठेवायची धमक होती. पुरुष घर सोडून बाहेर कौटुंबिक कारणास्तव किंवा स्वतः च्या करिअर साठी व्यस्त होतं असतो त्याचप्रमाणे एखादी स्त्री, मुलगी देखील स्वतः स्वप्न पूर्ण करण्यासाठी बाहेर पडत असते हे सत्य नाकारता येणार नाही. पण या सगळ्यांचा दुष्परिणाम आपल्या जोडीदारावर होतो संवाद न झाल्यामुळे आणि पुढे जाऊन नात्यात दुरावा निर्माण होऊन रेशीम धाग्यांनी गूंफलेले नाते घटस्फोटापर्यंत जाते. घटस्फोट हा पर्याय असू शकतो का? पण संवाद हा नक्कीच पर्याय असू शकतो. आणि हा सगळा नात्यातील गोडवा, संवाद, आपल्या समोर घेऊन आली आहे एक सुंदर जोडी अनुसया आर्ट्स निर्मित कशी हतबल कहाणी 'निमिष अर्थात शिरीष पवार जुई अर्थात श्रुती पाटील' पहायला विसरू नका.

# यवत पोलिसांची गांजा तस्करीविरोधात मोठी कारवाई

## महिलेकडून २ किलो १५५ ग्रॅम गांजा जप्त; १ लाख ७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात


दै.चालु वार्ता वृत्तसेवा
दौंड - प्रतिनिधी
अंकुश काळे




**दौंड :** गांजा तस्करीविरोधात यवत पोलिसांनी धडक कारवाई करत एका महिलेला ताब्यात घेत तिच्याकडून तब्बल २ किलो १५५ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला. या कारवाईत गांजासह इतर मुद्देमाल असा एकूण १ लाख ७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. यामुळे परिसरातील गांजा तस्करी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. दि.७ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजता यवत पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक आबा गाढवे यांना गांजा तस्करीबाबत गोपनीय माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीची पोलिस निरीक्षक संतोष तासगावकर यांनी वरिष्ठांची परवानगी घेऊन खात्री केली. त्यानंतर पोलिस पथकाने तत्काळ कारवाईचे नियोजन केले.

पोलिसांनी मिळालेल्या माहितीनुसार खोपोडी, गरडेवस्ती, ता. दौंड, जि. पुणे परिसरात सापळा रचला. यावेळी आरोपी महिला कमल बाबन गरडे (वय ६६ वर्षे, रा. खोपोडी, गरडेवस्ती, ता. दौंड, जि. पुणे) हिच्या घराची झडती घेण्यात आली.

झडतीदरम्यान घरामध्ये आर्थिक फायद्यासाठी विक्री करण्याच्या उद्देशाने ठेवण्यात आलेला २ किलो १५५ ग्रॅम वजनाचा हिरवट काळसर रंगाचा, बियांसह व भुयासह गांजा आढळून आला. पोलिसांनी हा गांजा पंचनामा करून जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या गांजाची अंदाजे किंमत १ लाख ७ हजार ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. सदर गांजा हा अमली पदार्थ अनधिकृतपणे बेकायदेशीररीत्या बाळगल्या प्रकरणी यवत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक संतोष तासगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार आणि उपविभागीय पोलिस अधिकारी बापूराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत पोलिस निरीक्षक संतोष तासगावकर, सहायक पोलिस निरीक्षक आबा गाढवे, पोलिस उपनिरीक्षक मारोती मेटलवाड, पोलिस हवालदार संदीप देवकर, महेंद्र चांदणे, अमोल काळे, संदीप करे, पोलिस कॉन्स्टेबल धीरज जाधव, प्रतिक जगताप, मारुती बाराते तसेच महिला पोलिस कर्मचारी स्वप्नाली टिळवे यांनी सहभाग घेतला. यवत पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे परिसरात सुरू असलेल्या अमली पदार्थांच्या अवैध व्यवहारांना मोठा धक्का बसला असून, गांजा तस्करीविरोधात यवत पोलिसांची कारवाई आणखी तीव्र होण्याचे संकेत मिळत आहेत.

# 'एसआयआर'मध्ये उदगीर विधानसभा मतदारसंघाची शंभर टक्के कामगिरी; जिल्ह्यात प्रथम क्रमांक


दै.चालु वार्ता वृत्तसेवा
उदगीर - प्रतिनिधी
अविनाश देवकते





## ३ लाख २० हजार ७१६ मतदारांच्या गणना प्रपत्रांचे वाटप व संगणकीकरण पूर्ण; जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव

**लातूर (उदगीर) :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण (Special Intensive Revision - SIR) मोहिमेत २३७ - उदगीर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघाने शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करून जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्याच्या दृष्टीने राबविण्यात आलेल्या या मोहिमेत उदगीर उपविभागाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

२३७ - उदगीर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघात एकूण ३५९ मतदान केंद्रे असून, ३ लाख २० हजार ७१६ मतदार आहेत. एसआयआरअंतर्गत प्रत्येक मतदारापर्यंत गणना प्रपत्र पोहोचविणे तसेच प्राप्त माहितीचे संगणकीकरण करण्याचे काम शंभर टक्के पूर्ण करण्यात आले आहे.

**३ लाखांहून अधिक गणना प्रपत्रांचे वाटप**

एसआयआर मोहिमेअंतर्गत मतदारसंघातील सर्व ३ लाख २० हजार ७१६ मतदारांना गणना प्रपत्रांचे वाटप करण्यात आले असून, प्राप्त झालेल्या सर्व प्रपत्रांचे संगणकीकरणही पूर्ण झाले आहे. या प्रक्रियेदरम्यान मतदार यादीची पडताळणी करताना मयत, अनुपस्थित, स्थलांतरित, दुबार तसेच इतर कारणांमुळे संबंधित मतदारांच्या नोंदी स्वतंत्रपणे घेण्यात आल्या आहेत.

**बाब संख्या**

एकूण मतदान केंद्रे ३५९
एकूण मतदार ३,२०,७१६
गणना प्रपत्रांचे वाटप ३,२०,७१६
संगणकीकरण केलेली प्रपत्रे ३,२०,७१६
मयत मतदार ६,९८५
अनुपस्थित मतदार ३,४४८
स्थलांतरित मतदार १९,८८९
दुबार मतदार ३,३८०
इतर ५४

एसआयआर प्रक्रियेदरम्यान आढळून आलेल्या मयत, अनुपस्थित, स्थलांतरित, दुबार तसेच इतर संबंधित मतदारांच्या नोंदी स्वतंत्रपणे घेण्यात आल्या असून, नागरिकांच्या माहितीसाठी संबंधित गावांमध्ये या नोंदी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. त्यामुळे मतदार यादीतील संभाव्य त्रुटी दूर करून ती अधिक अचूक आणि अद्ययावत करण्यास मदत होणार आहे.

**अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून यश**

हे काम मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार, उदगीर राम बोरगावकर, सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार, जळकोट राजेश लांडगे तसेच सर्व नायब तहसीलदार आणि नियुक्त सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले.

या मोहिमेत पर्यवेक्षक, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ), सहायक महसूल अधिकारी, महसूल सहाय्यक, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, सहायक कृषी अधिकारी, महसूल सेवक, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या तसेच इतर संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी परिश्रमपूर्वक सहभाग नोंदविला. सर्वांच्या समन्वयातून एसआयआरअंतर्गत शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले.

**जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव**

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत बाष्टेवाड आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश पवार यांच्या हस्ते मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार उदगीर राम बोरगावकर आणि सहायक मतदार नोंदणी अधिकारी राजेश लांडगे यांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी २३७ - उदगीर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघात एसआयआरअंतर्गत शंभर टक्के कामकाज पूर्ण करून जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून दिल्याबद्दल पर्यवेक्षक, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ), सहायक महसूल अधिकारी, महसूल सहाय्यक, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, सहायक कृषी अधिकारी, महसूल सेवक, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या तसेच मोहिमेत योगदान देणाऱ्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.


मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या मोहिमेत उदगीर मतदारसंघाने मिळविलेले जिल्ह्यातील प्रथम स्थान ही प्रशासनाच्या समन्वयपूर्ण आणि नियोजनबद्ध कामाची उल्लेखनीय पावती मानली जात आहे.

# लोकनेते स्व. बाबुरावजी काशिनाथ पाचर्णे साहेबांच्या स्मृतींना अभिवादन

## तर्डोबाचीवाडी येथे ११ ऑगस्टला चतुर्थ पुण्यस्मरण सोहळा; ह.भ.प. सुदाम महाराज पानेगावकर यांच्या कीर्तनाची पर्वणी


दै.चालु वार्ता वृत्तसेवा
शिरूर - प्रतिनिधी
इंद्रभान ओव्हाळ



**शिरूर :** सर्वसामान्यांशी जिव्हाळ्याचे नाते जपत सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात आपल्या कार्याचा ठसा उमटविणारे लोकनेते आमदार स्व. बाबुरावजी काशिनाथ पाचर्णे साहेब यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त तर्डोबाचीवाडी येथे भावपूर्ण स्मरणसोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत, शिवतारा कृषी पर्यटन, तर्डोबाचीवाडी, ता. शिरूर, जि. पुणे येथे हा कार्यक्रम होणार आहे.

या निमित्ताने आळंदी येथील विश्वशांती केंद्राचे ह.भ.प. सुदाम महाराज पानेगावकर यांचे विशेष कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. त्यांच्या कीर्तनातून संतविचार, आध्यात्मिक मार्गदर्शन आणि समाजप्रबोधनाचा संदेश उपस्थितांना मिळणार आहे.

**'बाबुराव पाचर्णे साहेब' नाव आजही जनमानसात जिवंत**

स्व. बाबुरावजी पाचर्णे साहेब यांच्या कार्याच्या आठवणी आजही त्यांच्या कार्यकर्त्यांच्या आणि जनसामान्यांच्या मनात ताज्या आहेत. सर्वसामान्यांशी असलेला आपलेपणा, जनतेच्या प्रश्नांशी असलेली बांधिलकी आणि सामाजिक कार्याची धडपड यामुळे त्यांनी आपल्या कार्यातून स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या पुण्यस्मरण सोहळ्याला पाचर्णे साहेबांचे सहकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार, हितचिंतक तसेच परिसरातील नागरिक उपस्थित राहणार आहेत.

**कीर्तनातून होणार स्मृतींना आदरांजली**

पुण्यस्मरणानिमित्त आयोजित करण्यात आलेले ह.भ.प. सुदाम महाराज पानेगावकर यांचे कीर्तन हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरणार आहे. संतविचारांच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक दिशा देतानाच स्व. पाचर्णे साहेबांच्या स्मृतींना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात येणार आहे.

'सत्कर्मांच्या दिव्य फुलांनी जीवन ज्यांचे बहरले, त्यांच्या आठवणी काळाच्या ओघातही कधीच पुसल्या जात नाहीत,' या भावनेतून पाचर्णे परिवार व प्रतिष्ठानच्या वतीने हा स्मरणसोहळा आयोजित करण्यात आला आहे.

**मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन**

स्व. बाबुरावजी पाचर्णे साहेब यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी तसेच कीर्तनाचा लाभ घेण्यासाठी शिरूर तालुक्यासह परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्व. बाबुरावजी पाचर्णे साहेब प्रतिष्ठान व समस्त पाचर्णे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

स्थळ : शिवतारा कृषी पर्यटन, तडीबाचीवाडी
ता. शिरूर, जि. पुणे
दिनांक : मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६
वेळ : सकाळी ९ ते ११ वाजता
विशेष आकर्षण : ह.भ.प. सुदाम महाराज पानेगावकर यांचे कीर्तन.

# दि.९ ऑगस्ट रोजी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयावर निघणाऱ्या आरक्षण उपवर्गीकरण विरोधी महामोर्चास लोहा तालुक्यातुन हजारोंच्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन


दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नांदेड - प्रतिनिधी




**नांदेड :** अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे अ.ब.क.ड असे वर्गीकरण शासनाने करु नये या प्रमुख मागणीसाठी दि.९. ऑगस्ट २०२६ रोजी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयावर आरक्षण उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर, रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने निघणार असून तेव्हा या महामोर्चास लोहा तालुक्यातील समाजबांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ मा.नगरसेवक बबनराव निर्मले, नगरसेवक प्र. बालाजी खिल्लारे, अनिल दादा गायकवाड यांनी केले आहे. राज्य शासनाने महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करुन अनुसूचित जाती मध्ये फुट पाडू नये, अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणास ठाम व संविधाननिष्ठ विरोध, अनुसुचित जातीच्या घटनात्मक संरक्षण करुन त्यांची कायम राखणे, अनुसुचित जाती प्रवर्गातील सर्व ५९ जातीचे ऐक्य एकोपा आणि सामाजिक सलोखा अबाधित राखणे, संविधानिक मार्गाने लोकजागृती करुन घटनात्मक हक्काच्या संरक्षणासाठी जनआंदोलन उभारण्यासाठी व भारतीय संविधान, सामाजिक न्याय आणि अनुसूचित जाती समाजाच्या ऐक्यासाठी दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महात्मा ज्योतिबा फुले पुतळ्यापासून जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड असा लाखोंच्या संख्येने महामोर्चा काढण्यात येणार आहे. तेव्हा सदरील महामोर्चाला लोहा तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी हजारो च्या संख्येने सामील व्हावे असे आवाहन आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ मा.नगरसेवक बबनराव निर्मले, नगरसेवक प्र. बालाजी खिल्लारे, अनिल गायकवाड, यांनी लोहा तालुक्यातील सर्व समाज बांधवांना केले आहे. तसेच त्यांनी सदरील महामोर्चासाठी माळाकोळी, चितळी, हिप्परगा, पांगरी, दापशेड, कलंबर, बेरळी देऊळगाव, सावरगाव न. रिसनगाव, आष्टूर, लव्हराळ, धानोरा, निळा, खडकमांजरी सह संपुर्ण लोहा तालुक्यात प्रत्यक्ष गावभेटी देऊन जनजागृती केली आहे व त्यांना प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळालेला आहे.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर 'शिव तांडव' ढोल-ताशा पथकाचा सराव सुरू


दै.चालु वार्ता वृत्तसेवा
भोर- प्रतिनिधी
अनिस आतार




**भोर :** काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरासह महाराष्ट्रभर ढोल-ताशा पथकांच्या सरावाला सुरुवात झाली आहे. भोर शहरातील 'शिव तांडव ढोल-ताशा पथकानेही आपली परंपरा आणि संस्कृती जपत यंदाच्या गणेशोत्सवासाठी सरावाला सुरुवात केली आहे. ढोल-ताशाच्या गजराने भोर शहरातील वातावरणात उत्साह निर्माण झाला आहे.

'शिव तांडव' ढोल-ताशा पथकाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून युवक-युवतींना पारंपरिक वादनाची संधी मिळत आहे. पथकात १०० हून अधिक मुले-मुली उत्स्फूर्तपणे सहभागी होत असून, सरावाच्या माध्यमातून वादनासोबतच शिस्त, एकजूट, वेळेचे नियोजन आणि संघभावना यांचे धडेही दिले जात आहेत.

महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि स्वाभिमान जपण्यासाठी ढोल-ताशा पथकांची भूमिका महत्त्वाची मानली जाते. शहरी भागापुरती मर्यादित न राहता ही परंपरा आता ग्रामीण भागातही मोठ्या उत्साहाने जोपासली जात असून, भोरसारख्या ग्रामीण भागातून ढोल-ताशाचा आवाज महाराष्ट्राच्या विविध भागांत घुमत आहे.

'शिव तांडव' पथकाने आतापर्यंत पुणे, सातारा, मुंबई, भोर, शिरवळ यांसह विविध ठिकाणी आपल्या वादनाचे सादरीकरण केले आहे. आपल्या दमदार वादनातून आणि शिस्तबद्ध सादरीकरणातून पथकाने अनेकांची मने जिंकली आहेत.

**भोरमध्ये संस्कृती-परंपरेचा गजर**

विविध गणेशोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मिरवणुकांमध्ये पथकाच्या वादनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

पथकाच्या जडणघडणीत प्रशांत कुंभार, शुभम पवार, सारस पवार, संदीप घोडेकर यांच्यासह अनेक युवक-युवती महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. पथकातील प्रत्येक वादकाला योग्य प्रशिक्षण देणे, सरावाचे नियोजन करणे आणि शिस्तबद्ध पद्धतीने वादन सादर करण्यासाठी सर्वजण मेहनत घेत आहेत.


गेल्या नऊ वर्षांपासून जपली जात असलेली ही परंपरा आता 'शिव तांडव' पथकाची स्वतंत्र ओळख बनली आहे. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या सांस्कृतिक प्रवासामुळे भोर तालुक्यातील तरुणाईमध्ये पारंपरिक वादनाची आवड निर्माण होत आहे. मोबाईल आणि आधुनिक मनोरंजनाच्या युगात युवक-युवतींना आपल्या मातीतल्या संस्कृतीशी जोडून ठेवण्याचे काम हे पथक करत आहे.

यंदाच्या गणेशोत्सवातही 'शिव तांडव' ढोल-ताशा पथकाचा दमदार नाद भोरसह विविध ठिकाणी घुमणार असून, महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेचा आणि संस्कृतीचा जागर करण्यासाठी पथक सज्ज होत आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल उरळगावमध्ये शालेय व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन

## - विशाल ओव्हाळ अध्यक्षपदी, वर्षाताई धूमाळ उपाध्यक्ष
## - राजेंद्र जांभळकर यांची माजी विद्यार्थी संघाच्या अध्यक्षपदी निवड

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वाघोली - प्रतिनिधी
स्वरुप गिरमकर



**(पुणे) वाघोली :** न्यू इंग्लिश स्कूल, उरळगाव येथे शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २०२६ रोजी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन, नवीन समितीची स्थापना तसेच माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक साकोरे सर यांनी केले. सौ. आफळे मॅडम यांनी सूत्रसंचालन केले, तर करडे सर यांनी शालेय व्यवस्थापन समिती व माजी विद्यार्थी संघाच्या कार्याबाबत उपस्थितांना माहिती दिली.

शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदासाठी श्री. विशाल ओव्हाळ व सौ. आशाताई कोकडे यांनी इच्छा व्यक्त केली. उपस्थित पालकांमध्ये झालेल्या चर्चेनंतर विशाल ओव्हाळ यांची अध्यक्षपदी, तर सौ. वर्षाताई धूमाळ यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच माजी विद्यार्थी संघाच्या अध्यक्षपदी राजेंद्र जांभळकर यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा मुख्याध्यापक साकोरे सर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माजी तंटामुक्ती समिती अध्यक्ष शिवाजी सात्रस यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच अध्यक्ष भीमराव कुदळे, बापू पाचुंदकर, शरद गिरमकर, प्रकाश आफळे, सचिन जसाभाटी, भूषण जांभळकर, भाऊसाहेब कोकडे, सौ. मनिषा जांभळकर, वर्षा जाधव, गिरमकर ताई, शुभांगी, हरिहर व शाहिन शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानून पालक मेळाव्याची सांगता करण्यात आली.

यापूर्वी शाळेला स्टिम लॅब उपलब्ध करून देण्यात आल्या असून आगामी काळात शाळेच्या विकासासाठी तसेच विध्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण कसे मिळेल यासाठी विविध सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबद्ध राहणार आहे

- विशाल ओव्हाळ, अध्यक्ष शालेय समिती उरळगाव

'शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि सर्वांगीण विकासासाठी आम्ही या दोन वर्षात प्रयत्न केले. यापुढेही शिक्षण हाच प्रगतीचा सर्वात प्रभावी मार्ग आहे,' त्यासाठी विध्यार्थ्यांना सवीतोपरी सहकार्य करणार आहे .

- भीमराव कुदळे , मा.अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती उरळगाव.

# आंतरजिल्हा बदलीग्रस्त शिक्षकांच्या मागण्यांसाठी ११ ऑगस्टला मुंबईत मुंडण आंदोलन

## शिक्षक सहकार संघटनेचा इशारा; महिला शिक्षिका, शिक्षक व कुटुंबीय मोठ्या संख्येने सहभागी होणार

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
देगलूर - प्रतिनिधी
संतोष मंनधरणे

**देगलूर :** महाराष्ट्रातील आंतरजिल्हा बदलीग्रस्त शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या, विविध समस्या व अडचणी शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी शिक्षक सहकार संघटनेच्या वतीने ११ ऑगस्ट २०२६ रोजी मुंबईतील आझाद मैदान व मंत्रालय परिसरात एकदिवसीय मुंडण आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात महिला शिक्षिका, शिक्षक तसेच त्यांच्या कुटुंबीयांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहणार असल्याची माहिती संघटनेचे राज्याध्यक्ष संतोष पिठलवाड यांनी दिली.

आंतरजिल्हा बदली प्रक्रियेमुळे निर्माण झालेल्या विविध प्रशासकीय, सामाजिक आणि कौटुंबिक समस्यांचा शिक्षकांना अनेक वर्षांपासून सामना करावा लागत आहे. बदलीनंतरही अनेक शिक्षकांच्या प्रश्नांवर ठोस तोडगा निघालेला नसल्याने संबंधित शिक्षकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने आंतरजिल्हा बदलीग्रस्त शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, या प्रमुख मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. शिक्षकांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी तसेच त्यांच्या अडचणी आणि कुटुंबीयांवर होणारे परिणाम व्यापक जनतेसमोर मांडण्यासाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.




### अनेक वर्षांपासून प्रश्न प्रलंबित

आंतरजिल्हा बदलीग्रस्त शिक्षकांना बदली प्रक्रियेनंतर विविध अडचणींचा सामना करावा लागत असून, या समस्यांमुळे शिक्षकांच्या कौटुंबिक जीवनावरही परिणाम होत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. त्यामुळे शासनाने या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे. ११ ऑगस्ट रोजी होणाऱ्या आंदोलनाची दैनिक वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांच्या माध्यमातून योग्य ती प्रसिद्धी करून आंतरजिल्हा बदलीग्रस्त शिक्षकांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. या आंदोलनाला राज्यातील हजारो आंतरजिल्हा बदलीग्रस्त शिक्षक व त्यांच्या कुटुंबीयांचा प्रतिसाद मिळण्याची शक्यता असून, शासन या आंदोलनाची दखल घेऊन प्रलंबित प्रश्नांवर कोणता निर्णय घेते, याकडे शिक्षकांचे लक्ष लागले आहे.


# डी.एल.एड.वार्षिक परीक्षेत प्रथम वर्षात साक्षी फाटक, तर द्वितीय वर्षात प्रिती महाद्वार प्रथम

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
धाराशिव - प्रतिनिधी
समीर मुल्ला

**कळंब :** येथील भैरवनाथ अध्यापक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जून २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या डी.एल.एड. वार्षिक परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्रथम वर्षातून साक्षी दत्तात्रय फाटक हिने ८३.८० टक्के, तर द्वितीय वर्षातून प्रिती रमेश महाद्वार हिने ८५.३० टक्के गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला.

डी.एल.एड. प्रथम वर्षाच्या वार्षिक परीक्षेसाठी विद्यालयातील एकूण ४९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ११ विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले असून ३९ विद्यार्थी एटीकेटीसह उत्तीर्ण झाले आहेत.

प्रथम वर्षातून साक्षी दत्तात्रय फाटक हिने ८३.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. निलेश नवनाथ चौधरी याने ८० टक्के गुणांसह द्वितीय, तर रुपाली रामचंद्र सावंत हिने ७९.९० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला.




## भैरवनाथ अध्यापक विद्यालयाची उल्लेखनीय कामगिरी; गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन

द्वितीय वर्षाच्या परीक्षेसाठी एकूण ४७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. द्वितीय वर्षातून प्रीती रमेश महाद्वार हिने ८५.३० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. स्नेहल दीपक खोडसे हिने ८४.४५ टक्के गुणांसह द्वितीय, तर साक्षी संतोषराव कवडे हिने ८१.८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील, डायटचे प्राचार्य डॉ.दयानंद जटनुरे, अध्यापक विद्यालयाचे संपर्कप्रमुख उमेश नरवडे, प्राचार्य प्रा. सतिश मातने, प्रा.श्रीकांत पवार, प्रा.मोहिनी शिंदे यांच्यासह विद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशामुळे भैरवनाथ अध्यापक विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला असून, यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# भोर तालुक्याचा शैक्षणिक गौरव!

## संस्था स्थळावर 'माझी शाळा सर्वोत्कृष्ट शाळा' पुरस्कारात श्री छत्रपती शिवाजी विद्यालय प्रथम क्रमांकावर

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
भोर- प्रतिनिधी
अनिस आतार

**भोर :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'माझी शाळा सर्वोत्कृष्ट शाळा पुरस्कार २०२६' मध्ये भोर तालुक्यातील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाची प्रथम क्रमांकासाठी निवड करण्यात आली. या उल्लेखनीय यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्याची दखल घेतली गेली असून, भोर तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शैक्षणिक विचारांना आणि कार्याला अभिवादन करत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कार, शिस्त, सामाजिक बांधिलकी तसेच विविध कौशल्ये आत्मसात करण्यासाठी विद्यालयाकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. या विविध उपक्रमांची, शैक्षणिक गुणवत्तेची, विद्यार्थ्यांच्या प्रगतीची तसेच विद्यालयाच्या एकूण कामगिरीची दखल घेत 'माझी शाळा सर्वोत्कृष्ट शाळा पुरस्कार २०२६' या पुरस्कारासाठी श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाची प्रथम क्रमांकाने निवड करण्यात आली. हा पुरस्कार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. विद्यालयाच्या वतीने प्राचार्य अजय काळभोर सर यांनी हा सन्मान स्वीकारला.




या यशामागे विद्यालयातील शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक तसेच संस्थेचे पदाधिकारी यांचे मोलाचे योगदान आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच त्यांच्यातील कला, क्रीडा, संस्कार, नेतृत्वगुण आणि सामाजिक जाणीवा विकसित करण्यासाठी विद्यालयाकडून विविध उपक्रम राबविले जातात. भोर तालुक्यातील एका विद्यालयाला स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या स्तरावर प्रथम क्रमांकाचा मान मिळणे ही संपूर्ण भोर तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे. या पुरस्कारामुळे विद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, भविष्यातही शैक्षणिक क्षेत्रात आणखी उल्लेखनीय कामगिरी करण्यासाठी विद्यालयाला प्रेरणा मिळाली आहे.

# शेती विषय बाजार भाव माहिती

| शेतमाल | एकक | आवक | किमान (रु.) | कमाल (रु.) | सरारसी (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| तांदुळ (बासमती) | क्विंटल | ८५ | ९६०० | ११००० | १०३०० |
| तांदुळ (कोलम) | क्विंटल | ५५४ | ४५०० | ६९०० | ५७०० |
| तांदुळ (इंद्रायणी) | क्विंटल | ११२ | ५००० | ६५०० | ५७५० |
| गहु (लोकवन) | क्विंटल | २७८८ | ३१०० | ४२०० | ३६५० |
| गहु (गुजरात तुकडी) | क्विंटल | ४१९ | ३६०० | ४४०० | ४००० |
| गहु (सिहोर) | क्विंटल | ४८० | ५००० | ६००० | ५५०० |
| ज्वारी (वसंत नं.९) | क्विंटल | ६३५ | ४३०० | ४६०० | ४४५० |
| ज्वारी (दुरी) | क्विंटल | ४८५ | ४१०० | ४४०० | ४२५० |
| बाजरी (गावरान) | क्विंटल | ७१६ | ३१०० | ३४०० | ३२५० |
| बाजरी (संकरीत) | क्विंटल | ४६३ | ३३०० | ३६०० | ३४५० |
| मिरची (ब्याडगी) | क्विंटल | ३ | ४०००० | ४२००० | ४१००० |
| मिरची (गुंटूर) | क्विंटल | २ | २९००० | ३०००० | २९५०० |
| मिरची (लवंगी) | क्विंटल | ३ | २३००० | २५००० | २४००० |
| वाटाणा (हिरवा) | क्विंटल | ४६ | ७१०० | ७८०० | ७४५० |
| वाटाणा (पांढरा) | क्विंटल | ४२ | ४३०० | ५४०० | ४८५० |
| मसूर | क्विंटल | ४३ | ७१०० | ७५०० | ७३०० |
| धना (इंदौर) | क्विंटल | ३ | ११००० | १३००० | १२००० |
| धना (गावरान) | क्विंटल | १ | १०००० | १२००० | ११००० |
| हरभरा (चाफा) | क्विंटल | ४२ | ६२०० | ७३०० | ६७५० |
| हरभरा (संकरीत) | क्विंटल | ३६ | ६४०० | ७५०० | ६९५० |
| उडीद | क्विंटल | ७ | ९२०० | १०५०० | ९८५० |
| मका (तांबडा) | क्विंटल | ५ | २५०० | २८०० | २६५० |
| चिंच (जुनी) | क्विंटल | ३ | ९५०० | १०५०० | १०००० |
| चिंच (नवी) | क्विंटल | २ | १०५०० | १२५०० | ११५०० |
| शेंगदाणे (घुंगरू) | क्विंटल | ७४२ | १२९०० | १३९०० | १३४०० |
| शेंगदाणे (जाडा) | क्विंटल | ४८७ | १२६०० | १३२०० | १२९०० |
| शेंगदाणे (स्पॉनिश) | क्विंटल | ४८० | १३५०० | १५००० | १४२५० |
| हळद (राजापुरी) | क्विंटल | २ | २३००० | २५००० | २४००० |
| चवळी | क्विंटल | ३ | ८२०० | ९३०० | ८७५० |
| नाचणी | क्विंटल | २ | ५४०० | ५८०० | ५६०० |
| गुळ (पिवळा नं.१) | क्विंटल | ३९५ | ४७०१ | ४७६१ | ४७३१ |
| गुळ (लाल) | क्विंटल | ३३५ | ४३७५ | ४५५१ | ४४६३ |
| गुळ (बॉक्स) | क्विंटल | ३९२ | ४७०० | ५००० | ४८५० |

# नांदेड जिल्हा ओबीसी मोर्चा पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न

## ओबीसी नेते गजानन श्रीरामवार यांना नियुक्ती पत्र देऊन जिल्हा अध्यक्षा कडुन सन्मान

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
उमरी - प्रतिनिधी
श्रीनिवास मुक्कावार



**उमरी :** नांदेड शासकीय विश्रामगृह येथे जिल्हयातील ओबीसी नेते भाजपा माजी नगरसेवक गजानन श्रीरामवार यांची भाजपा ओबीसी जिल्हा सरचिटणीस पदी निवड झाल्याने त्यांचा ओबीसी जिल्हा मोर्चा नांदेड जिल्हाध्यक्ष मा.उतम चव्हाण साहेब यांच्या हस्ते व भाजपाच्या पदाधिकारी यांच्या उपस्थितीत श्रीरामवार यांना नियुक्ती पत्र देऊन सन्मान करण्यात आला.

भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा नांदेड जिल्हा कार्यकारणी पदाधिकाऱ्यांची बैठक नांदेड येथे संपन्न झाली. या बैठकीत नवनिर्वाचित जिल्हा पदाधिकारी सरचिटणीस, उपाध्यक्ष, चिटणीस, कार्याध्यक्ष कोषाध्यक्ष, संघटक, विशेष निमंत्रक त्याच बरोबर जिल्हा कार्यकारणी सदस्य या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सर्व जिल्हा कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांची एकमेकांशी अल्पसा परिचय करून घेण्यात आला.

येणाऱ्या काळामध्ये नांदेड दक्षिण जिल्ह्यातील मंडळ अध्यक्षच्या आणि इतर पदाधिकाऱ्याच्या निवडीच्या संदर्भाने चर्चा करण्यात आली. झालेल्या जिल्हा कार्यकारणी पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत श्रीरामवार यांच्यासह ६ जिल्हा सरचिटणीस, ५ जिल्हा उपाध्यक्ष, ५ जिल्हा चिटणीस , कोषाध्यक्ष, कार्याध्यक्ष, जिल्हा सोशल मीडिया प्रमुख, संघटक, १० जिल्हा कार्यकारणी सदस्य व इतर सहकारी उपस्थित होते.

# कु.रिशिता सोने यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
कुंडलवाडी - प्रतिनिधी
श्रीनिवास मुक्कावार

**कुंडलवाडी :** नुक्तेच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे, अंतर्गत घेण्यात आलेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत बिलोली येथील लिट्ल फॅलावर कॉन्वेट शाळेत ७ व्या वर्गात शिक्षण घेणारी कु. रिशिता निरंजन सोने हिने २८९ पैकी १६४ गुण घेवून यश संपादन करीत शिष्यवृत्तीस पात्र ठरली. तिच्या या यशाबद्दल मित्र परिवारातर्फे कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे. रिशिता निरंजन सोने बिलोली तालूक्यातील नागापूर येथील रहिवाशी के. पी.सोने सर, माजी शिक्षणाधिकारी यांची नात होत.



This Daily Printed, Published and Owned by **Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** Printed at Girish Printers and Paper Converters, 150, Shaniwar Peth, Near Amruteshwar Mandir, Pune (M.S.)-411030 and Published at Flat No.806, 8 th Floor, Ratan Neptune, Handewadi Road, Hadapsar, Pune (M.S.)-411028 ■ **Editor : Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** ■ Mob No.: **9373504748** ■ Email **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (JURISDICTION AT PUNE)

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** यांनी गिरीष प्रिंटर्स अँड कन्व्हर्टर्स, १५०, शनिवार पेठ, अमृतेश्वर मंदिराजवळ, पुणे (महाराष्ट्र)- ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.८०६, ८ वा मजला, रतन नेपच्युन, हंडेवाडी रोड, हडपसर, पुणे (महाराष्ट्र)-४११०२८ येथून प्रकाशित केले. ■ **संपादक - श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** ■ मो.नं.**9373504748** ■ Email - **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (सर्व वाद पुणे न्याय कक्षेत)